रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अहवाल

(सोलापूर जिल्हयाच्या संबंधात)

(अहवाल दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
२०१५

रोजगार हमी योजना समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अहवाल

(सोलापूर जिल्हयाच्या संबंधात)

(अहवाल दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

(तीन)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती

(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(५) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.
(६) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.
(७) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(८) श्री. संतोष दानवे, वि.स.स.
(९) श्री. संदिपानराव भुमरे, वि.स.स.
(१०) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. नारायण पाटील, वि.स.स.
(१२) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स
(१४) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१५) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(१६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(१८) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.
(१९) ॲड. राहूल कुल, वि.स.स.
(२०) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(२१) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
(२२) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(२३) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२४) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(२५) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, सह सचिव (२),
(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव.

(चार)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती
(सन २०१३-२०१४)

समिती प्रमुख

* (१) श्री. दिलिपकुमार सानंदा, वि.स.स.

सदस्य

(२) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.
(३) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(४) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(५) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(६) श्री. भाऊराव पाटील, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(१२) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.
(१३) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स
(१५) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(१६) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
(१८) कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
(२०) श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स.
(२६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स. (निमंत्रित)
(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, उप सचिव,
(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

---

* ॲड सदाशिवराव पाटील, वि.स.स. यांनी "समिती प्रमुख" पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दि. ३१ जुलै, २०१४ रोजी नियुक्त केली आहे.

(पाच)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
रोजगार हमी योजना समिती
(सन २०१३-२०१४)

समिती प्रमुख

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री. भाऊराव पाटील, वि.स.स.
(६) श्री. दिलिपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(१२) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.
(१३) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स
(१५) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(१६) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(१७) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
(१८) कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
(२०) श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स.
(२६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स. (निमंत्रित)
(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. म.मु. काज, उप सचिव,
(३) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव (समिती).
(४) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

(सहा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना :	
१.	कामाचे वार्षिक नियोजन	-
२.	निधी, पुरवठा व खर्च	-
३.	मजूरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च	-
४.	मजूरीचे वाटप	-
५.	विहीर कार्यक्रम	-
६.	गैरव्यवहाराची प्रकरणे	-
	परिशिष्ट :	
(एक)	- कामाचे वार्षिक नियोजन	-
(दोन)	- निधी, पुरवठा व खर्च	-
(तीन)	- मजूरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च	-
(चार)	- मजूरीचे वाटप	-
(पाच)	- गैरव्यवहाराची प्रकरणे	-
(सहा)	- बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	-

(सात)

प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना "समितीचा प्रमुख" या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक २४ सप्टेंबर, २०१३ व २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१३-२०१४ या वर्षासाठी समिती गठीत केली. सन २०१३-१४ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक १० व ११ जानेवारी, २०१४ रोजी सोलापूर येथे जिल्हा बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणाऱ्या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्हयातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करुन ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल समितीचे सर्व सदस्य, जिल्हयातील लोकप्रतिनिधी, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरुन समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे..

समितीने सदर अहवाल दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी विचारात घेतला व संमत केला.

विधान भवन :
नागपूर
दिनांक डिसेंबर, २०१५.

जयकुमार रावल,
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

रोजगार हमी योजना समितीचा अहवाल
(सोलापूर जिल्हा)

(१) कामाचे वार्षिक नियोजन :-

रोजगार हमी योजना समितीने दिनांक १० व ११ जानेवारी, २०१४ रोजी सोलापूर येथे जिल्हा बैठका आयोजित केल्या होत्या. बैठकींच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "कामाचे वार्षिक नियोजन" या संबंधात समितीने विचारणा केली की, सन २०१४-१५ बाबत वार्षिक नियोजन करीत असताना कशा प्रकारची कामे व त्यासाठी किती रक्कम प्रस्तावित केली ? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यांच्या एकत्रित वार्षिक नियोजन आराखड्यानुसार सन २०१४-१५ साठी मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर ९५,८४७ कामे सूचविण्यात आली, त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम १,२२,०५० लाख रूपये आणि यंत्रणा स्तरावर २७,५०४ कामे सूचविण्यात आली, त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम ५९,०७१ लाख रूपये आहे. अशा प्रकारे ग्रामपंचायत आणि यंत्रणा स्तरावर एकत्रितपणे १,२३,३५१ कामे सूचविण्यात आली असून त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,८१,१२१ लाख इतकी आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०१४-१५ मधील वार्षिक नियोजन करीत असताना ग्रामपंचायत आणि यंत्रणा स्तरावर ५०:५० च्या निर्णयानुसार कामे करणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीच्या तुलनेत यंत्रणा स्तरावरील कामांची संख्या ३० टक्क्यांपेक्षा कमी असून त्यात फार मोठी तफावत आहे, याची कारणे काय आहेत ? तसेच वार्षिक आराखड्याची आकडेवारी आणि उद्दिष्ट काय आहे ? त्यात ग्रामपंचायतींनी किती कामे सुचविलेली आहेत ? याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सर्व ग्रामसभांना कामे सुचविण्यास सांगण्यात आले आहे. ग्रामपंचायतींनी सुचविलेल्या सर्व कामांचा समावेश त्यात करण्यात येतो. ग्रामपंचायतीमध्ये सर्वसामान्य लोकांचा सहभाग असतो. तेथे मोठ्या संख्येने कामे सुचविली जातात. या उलट यंत्रणा स्तरावर तालुक्यांचा विचार करून त्या अनुषंगाने तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडून कामे सुचविली जातात. त्यात वैयक्तिक स्वरुपाच्या तसेच सर्वसामान्य योजनांवर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात येत आहे. अशा कामांची संख्या कमी असली तरी त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम जास्त आहे. सन २०१४-१५ साठी ८८ कोटी रूपये रकमेचे आणि ३० लाख मनुष्यदिवस निर्मितीसाठी लेबर बजेट तयार करण्यात आले आहे, त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्य शासनाकडून जे अंदाजपत्रक दिले जाते त्यातून जिल्हयातील कामे करण्यासाठी उद्दिष्ट ठरवून दिले आहे, ते साध्य करण्यासाठी किती निधी अपेक्षित आहे ? पेमेंटच्या संदर्भात जिल्हा स्तरावरून राज्य

शासनाकडे आणि राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे निधीची मागणी केली जाते. त्यानंतर केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत असतो. या संदर्भात सुधारणा झाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मागील वर्षांचा विचार केल्यास सन २०१४-१५ या वर्षासाठी ८८ कोटी रूपयांपर्यंत खर्च होईल. तथापि कामांची संख्या जास्त वाढल्यास त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन बांधिल आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, काही ठिकाणी रक्कम प्रदान करण्यात आली नाही, त्या ठिकाणी निधी उपलब्ध नव्हता म्हणून रक्कम प्रदान झाली नव्हती की त्यात काही त्रुटी राहिल्या होत्या ? सन २०१४-१५ मध्ये उद्दिष्ट काय आहे ? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मग्रारोहयोची सुरूवात झाल्यानंतर काही वर्षे त्यात सुसूत्रता नव्हती. आता अद्ययावत पध्दती सुरु झाली आहे. निधीअभावी रक्कम प्रदान करण्याचे राहत नाही. विशिष्ट रकमेत प्रमाणित उद्दिष्ट सांगता येणार नाही. मजूरांच्या मागणीनुसार त्यांना कामे देणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे.

जिल्हयातील ग्रामपंचायती, गावे तसेच यंत्रणानिहाय कामे व्हावीत असा नियम आहे. एकूण कामांपैकी प्रत्येक यंत्रणांनी १० ते १५ टक्के कामे करणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायतीच्या स्तरावर मागेल त्याला काम आणि मजुरांना ५ कि.मी. च्या हद्दीपर्यंत कामे मिळाली पाहिजेत असा उद्देश होता. नवीन मग्रारोहयो अंतर्गत ५० टक्के ग्रामपंचायती आणि ५० टक्के यंत्रणांनी कामे करावीत असा नियम आहे. अशा परिस्थितीत ५०:५० च्या प्रमाणानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. लोकांपर्यंत कामे पोहचविता आली पाहिजेत, यासाठी यंत्रणा आहेत. कामांचा सर्व्हे करणे, ग्रामसभांमध्ये जाऊन त्यासंबंधीची सविस्तर माहिती देऊन प्रबोधन करणे यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे असे समितीने सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, गावात दवंडी देणे, मजुरांच्या भेटी घेऊन त्यांना कामावर येण्यास सांगणे अशा प्रकारची कार्यवाही केली जात आहे व जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मग्रारोहयोसाठी एकत्रित पुरवणी वार्षिक नियोजन आराखड्यात ग्रामपंचायत स्तरावर १,२३,०८९ कामे या उलट यंत्रणा स्तरावर २,६१५ कामे दर्शविण्यात आली आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आहे, ही बाब योग्य नाही असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २०१४-१५ करीता तयार करण्यात आलेल्या वार्षिक नियोजन आराखड्याच्या खाली जी माहिती नमूद केलेली आहे ती सन २०१३-१४ मधील पुरवणी वार्षिक नियोजन आराखड्याची माहिती आहे. यंत्रणा स्तरावर सुचविण्यात आलेल्या कामांची टक्केवारी कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली होती. त्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना कामे सूचविण्याबाबत सूचना दिलेल्या

आहेत. सन २०१४-१५ करीता ८८ कोटी रक्कमेचे व ३० लाख मनुष्य दिवस निर्मितीचे लेबर बजेट तयार करण्यात आलेले आहे.

मजुरांना जॉबकार्ड देऊन संबंधित गावाच्या हद्दीत मजूरांना काम उपलब्ध करुन दिले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, यावर्षी १,८११ कोटी रुपये किंमतीची कामे प्रस्तावित केली आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी समितीला दिलेल्या या उत्तरामुळे समितीचे समाधान झालेले नाही. परंतु मागील तीन-चार वर्षातील एकूण कामे पाहिली तर यावर्षी बऱ्यापैकी नियोजन केले आहे, असे लेखी माहितीवरुन दिसून येते. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक अधिकाऱ्याला उद्दिष्ट ठरवून दिले पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी याबाबत सकारात्मक उत्तर दिले.

ग्रामपंचायत स्तर आणि यंत्रणा स्तर यामध्ये फरक आहे. काही जिल्ह्यात सामाजिक वनीकरणाची चांगली कामे झाली आहेत. ग्रामपंचायत किंवा गावातील लोक सामाजिक वनीकरणाच्या कामाची मागणी करीत नाहीत. ग्रामपंचायतीने कामाची मागणी केली तर ५ किलोमीटरच्या आत काम उपलब्ध करुन दिले पाहिजे. मजूर जर ५ किलोमीटर अंतरापेक्षा जास्त अंतरावर काम करण्यास तयार असतील तरी काम उपलब्ध करुन दिले पाहिजे. सन २०१३-१४ मध्ये ग्रामपंचायत स्तरावर १,२३,०८९ कामे सुचविण्यात आलेली आहेत. परंतु यंत्रणा स्तरावर फक्त २,६१५ कामे सुचविण्यात आलेली आहेत. यंत्रणा स्तरावर कमी कामे सुचविण्याची कारणे काय आहेत आणि या कामांवर आता पर्यंत किती खर्च झालेला आहे ? अशी समितीने विचारणा केली त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायत स्तरावर डिसेंबर अखेरपर्यंत २७,६२,४६,०००/- रुपये खर्च झालेले आहेत आणि यंत्रणा स्तरावर ५,३५,७२,०००/- रुपये खर्च झालेले आहेत.

ग्रामपंचायत आणि यंत्रणा स्तरावरील खर्चाचे प्रमाण व्यस्त आहे. ग्रामपंचायत स्तरावरील खर्चाचे प्रमाण जास्त आहे. डिसेंबर अखेर पर्यंत ग्रामपंचायत स्तरावर २७,६२,४६,०००/- रुपये खर्च केले आहेत. मार्च अखेर पर्यंत किती टक्के खर्च झाला आहे असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही सुचविण्यात आलेल्या कामांची एकूण रक्कम आहे.

सन २०१३-१४ मध्ये ग्रामपंचायत स्तरावरील कामांची अंदाजपत्रकीय रक्कम ५५५ कोटी ८७ लाख रुपये इतकी आहे. म्हणजे मार्च अखेर पर्यंत ५५५ कोटी ८७ लाख रुपये खर्च करावयाचे होते. परंतु डिसेंबर अखेर पर्यंत फक्त २७ कोटी रुपये खर्च केले आहेत. हे यंत्रणांचे अपयश नाही काय ? अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मजुरांना काम उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. ग्रामपंचायत स्तरावरुन सुचविण्यात आलेल्या कामांची ही एकूण बेरीज आहे. ग्रामपंचायतीकडून विहिरींची, रस्त्यांची किंवा इतर कामे सुचविली जातात. परंतु अनेक वेळा कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. मजुरांनी रोजगार हमी योजनेच्या कामावर यावे यासाठी गावात दवंडी दिली आहे. मजुरांनी कामाची मागणी केली तर

त्या संबंधित कामाची पूर्तता केली जाते. परंतु अनेक वेळा असे होते की, मागणी आली नाही तर ग्रामपंचायतीने सुचविलेली कामे पूर्ण होत नाहीत व त्यासाठी नियोजनात नमूद केलेली रक्कम खर्च होत नाही. त्याकरीता यंत्रणांकडून जास्तीत जास्त पूर्तता करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

लेखी माहितीमध्ये वनीकरणाच्या एकूण कामांची संख्या "शून्य" दाखविलेली आहे. सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत वन विभागाने कामे केलेली नाहीत काय ? वन अधिकाऱ्यांनी कामे का सुचविली नाहीत ? समितीने अशी विचारणा केली असता उप वन संरक्षक, सोलापूर यांनी सांगितले की, वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाची कामे एकत्रित दाखविण्यात आली आहेत. सामाजिक वनीकरणाची जी कामे दाखविली आहेत त्यामध्ये वन विभागाच्या कामांचा समावेश आहे. यासंदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, सामाजिक वनीकरण विभागाने करावयाच्या कामांचे स्वरुप आणि वन विभागाने करावयाच्या कामांचे स्वरुप वेगळे आहे. मग सामाजिक वनीकरण आणि वनीकरणाची कामे एकत्रित का दाखविण्यात आली? त्यावर उप वन संरक्षक यांनी असा खुलासा केला की, वनीकरण, रोपवाटीका, सीसीटीची कामे दोन्ही विभाग करीत असतात, म्हणून ही कामे एकत्रित दाखविलेली आहेत.

रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्ष लागवड करणे हे काम सामाजिक वनीकरण विभागामार्फत केले जाते. परंतू, वन निर्माण करण्याचे काम वन विभागाने करावयाचे असते. वन निर्माण करण्याचे काम सामाजिक वनीकरण विभागामार्फत केले जात नाही. सामाजिक वनीकरण आणि वनीकरण हे दोन्ही विभाग वेगळे आहेत. सामाजिक वनीकरण विभागाने केलेल्या एकूण खर्चाची टक्केवारी ९.०६ टक्के इतकी दाखविली आहे. यापैकी वन विभागाने किती रक्कम खर्च केला व कोणती कामे केलेली आहेत ? असे समितीने विचारले असता, उप वन संरक्षक यांनी सांगितले की, सामाजिक वनीकरण आणि वनीकरण हे दोन्ही विभाग वेगळे आहेत. परंतु येथे दोन्ही विभागांची कामे एकत्रित दाखविलेली आहेत. सन २०१३-१४ मध्ये १६,९८,०००/- रुपये खर्च केले आहेत. नियोजन एकत्र केले असल्यामुळे ती माहिती एकत्रित दिलेली आहे. समितीने पुढे विचारणा केली की, सामाजिक वनीकरण आणि वन विभागाची कामे वेगळी दाखवावयास पाहिजे होती. सामाजिक वनीकरण आणि वन विभागाची कामे एकत्र दाखविता येत नाहीत. सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत वन विभागाच्या एकूण कामांची संख्या "शून्य" नमूद केली आहे. मग या कालावधीत वन विभागाने कोणती कामे केली आहेत ? यासंदर्भात उप वन संरक्षक यांनी सांगितले की, वन विभागाने वृक्ष लागवड करणे, सलग समतल चर खोदणे, रोपवाटिका तयार करणे इत्यादी कामे केलेली आहेत. सांगोला, मोहोळ, अंजनगाव तालुक्यात सीसीटीची कामे केलेली आहेत. सामाजिक वनीकरण आणि वन विभागाने वेगवेगळी कामे करावीत आणि तशा प्रकारचे विभागाचे नियोजन असावे असे समितीने स्पष्ट केले असता, उप वन संरक्षक यांनी सकारात्मक उत्तर दिले.

पाटबंधारे विभागाच्या एकूण खर्चाची टक्केवारी २१.६९ टक्के परिशिष्ट - एक मध्ये नमूद केलेली आहे. मातीचे धरण, मातीचे कालवे, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवा, गाव तलाव, भूमिगत बंधारे, कालव्याचे नूतनीकरण, तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावांचे नूतनीकरण करणे या कामांवर पाटबंधारे विभागाने सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत फक्त २१ टक्केच खर्च केलेला आहे. पाटबंधारे विभागाने कमी खर्च करण्याची कारणे काय आहेत ? तसेच सन २००९-१० व २०१०-११ मध्ये किती खर्च केलेला आहे ? अशी समितीने विचारणा केली, त्यावर कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये २.५४ लाख रुपये आणि सन २०१३-१४ मध्ये ४९.०५ लाख रुपये खर्च झाले आहेत. सन २००९-१०, २०१०-११ मध्ये खर्च झालेला नाही. सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत पाटबंधारे विभागाच्या एकूण खर्चाची टक्केवारी २१.६९ टक्के नमूद केली आहे आणि सन २००९-१० व २०१०-११ मध्ये खर्च झालेला नाही. याबाबत योग्य उत्तर देण्यात आलेले नाही असे समितीने स्पष्ट केले असता, कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांनी प्रस्तूत कामे त्यांच्या विभागाच्या अखत्यारित येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

पाटबंधाऱ्याच्या कामावरील खर्च कोणी केला व कामे कोणी केली याचे उत्तर देण्यासाठी संबंधित एकही कार्यकारी अभियंता आपल्या जागेवर उभे राहून उत्तर देणार नसतील तर हे बरोबर नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सर्व विभागातील कामांची संख्या ३५,२८१ इतकी आहे. एकंदरीत या कामावर ८४,६८०.५५ लाख रुपये खर्च झाला आहे. अपेक्षित मनुष्यदिवस निर्मिती आहे. पाटबंधारे स्वरुपाची कामे आराखड्यात प्रस्तावित केली होती, ती ३२.६१ टक्क्यांची आहे. कृषीची कामे ३५ टक्के होती. यासंदर्भातील ब्रेकअप दिला आहे ही आराखड्याची टक्केवारी असून खर्चाची टक्केवारी नाही.

सन २०१०-२०११ मध्ये एकूण खर्चाची टक्केवारी ३२.६१ एवढी दर्शविलेली असताना पाटबंधाऱ्याची कामे केली नाहीत असे म्हणणे योग्य होणार नाही तसेच एकूण खर्चाची टक्केवारी २१.६९ (परिशिष्ट - एक) दर्शविलेली आहे, असे असताना समितीला असत्य माहिती देणे उचित नाही. या विभागात एकूण किती कार्यकारी अभियंते कार्यरत आहेत ? त्यांनी पाटबंधाऱ्याच्या कामाच्या संदर्भात समितीला माहिती द्यावी असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता यांनी सन २००९-१० आणि २०१०-११ मध्ये पाटबंधारे विभागात कामे झालेली नाहीत असे सांगितले. पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने नाराजी व्यक्त केली व सन २००९-१०, २०१०-११ आणि २०११-१२ मधील जलसंपदाच्या कामांचे वर्गीकरण करुन समितीला माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले.

जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा कार्यक्रम एकत्रित दर्शविलेला आहे. पाटबंधारेमधील सर्व कामे एकत्रित दाखविण्यात आलेली आहे. ही सर्व कामे वेगवेगळी दर्शविली

असती तर अडचण आली नसती. सबंधित अधिकाऱ्यांनी या कामांचे वर्गीकरण करुन सदरहू माहिती समितीला द्यावी असे समितीने सूचित केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदरहू माहिती परिशिष्ट - एक मध्ये नमूद केली आहे. सन २००९-१० ते २०१३-१४ (माहे ऑक्टोबर २०१३ अखेर) च्या वार्षिक नियोजन आराखड्याची माहिती दर्शविलेली आहे. या ठिकाणी दर्शविण्यात आलेल्या तत्क्यामध्ये एकूण कामे (संख्या), अंदाजित खर्च (लाखात), अपेक्षित मनुष्य दिवस (लाखात) आणि एकूण खर्चाच्या टक्केवारीची माहिती दिलेली आहे. या ठिकाणी दर्शविण्यात आलेल्या तक्त्यामध्ये कामनिहाय टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे. विभागनिहाय टक्केवारी दर्शविण्यात आलेली नाही. दोन नंबरच्या कॉलममध्ये कृषी स्वरुप, पाटबंधारे, सामाजिक वनीकरणाची कामे दर्शविलेली आहेत. यासंदर्भातील आराखडा सन २००९-१० मध्ये तयार केलेला आहे. या ठिकाणी ८४,६८०.५५ लाख रुपयांचा अंदाजित खर्च प्रस्तावित केलेला आहे. यापैकी ३२.६१ टक्के पाटबंधाऱ्यातील कामे प्रस्तावित केलेली होती. आराखड्यामध्ये कामाचा प्रकारनिहाय खर्च प्रस्तावित केलेला असून, त्याची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायतीमार्फत ५० टक्के कामाच्या नियोजनांतर्गत काही तालुक्यांमध्ये कामे कमी घेण्याची कारणे कोणती ? अक्कलकोटमध्ये ५,४०० कामे सुचविलेली आहेत आणि उत्तर सोलापूरमध्ये २३२ कामेच दाखविलेली आहेत. करमाळ्याला ५३७, माढ्याला ८०६ कामे सुचविलेली आहेत. मग अक्कलकोटमध्ये ५,४०० कामे सुचविण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, हा आराखडा त्या त्या तालुक्यातील कामांचा आहे. विविध ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या कामांच्या बेरीजेची माहिती तक्त्यामध्ये दर्शविलेली आहे. सार्वजनिक कामे हाती घेतली तर त्यामध्ये एकूण रक्कम आणि मनुष्य दिवस वाढते पण कामांची संख्या वाढत नाही. अक्कलकोटमध्ये जवळ जवळ ३५ ते ३६ गावे आहेत. उत्तर सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. त्या ठिकाणी सार्वजनिक स्वरुपाची जास्त कामे सुचविण्यात आलेली आहेत आणि अक्कलकोट तालुक्यात व्यक्तीगत स्वरुपात जास्त कामे सुचिवण्यात आल्यामुळे तफावत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आश्वासित केल्यानुसार समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या प्रश्नांची पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली.:-

- ❖ ग्रामपंचायत स्तरावर व तालुका स्तरावर कोणकोणती यंत्रणा कोणकोणत्या योजनांची कामे करतात व त्याचे स्वरूप काय आहे ?
- राज्य कायद्यांतर्गत अधिनियमाच्या कलम ६, ७.२ (तीन) (चार) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असून, कलम ६.१, ६.३ (ब)

व कलम १६-ब (सुधारीत) नुसार राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियोजन व कार्यवाही करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या प्रमुख यंत्रणा आहेत.

- ग्रामपंचायत स्तरावर व तालूका स्तरावर विविध यंत्रणा नरेगा अंतर्गत खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे कामे करतात.

यंत्रणा	यंत्रणांनी करावयाची कामे
जिल्हा परिषद अंतर्गत	
ग्रामपंचायत	रोपवाटीका, वृक्ष लागवड, वैयक्तिक विहिर, विहिर पुनर्भरण, शाळेचे मैदान, शौच खड्डे, शौचालय इत्यादी.
जिल्हा परिषद बांधकाम	रस्ते, राजीव गांधी भवन इत्यादी.
जिल्हा परिषद लघु पाटबंधारे	गाव तलाव / पाझर तलाव, गाळ काढणे, वृक्ष लागवड, रोपवाटीका इत्यादी.
जिल्हा परिषद कृषी विभाग	मृद व जलसंधारणाची कामे (सीसीटी, कपार्टमेंटबंडीग, नालाबंडीग इत्यादी.), वृक्ष लागवड इत्यादी.
शासकीय यंत्रणा	
कृषी विभाग	मृद व जलसंधारणाची कामे, (शेततळी, समतलचर/सी.सी.टी. नालाबंडीग इत्यादी,) नाला सरळीकरण, वृक्ष लागवड, रोपवाटीका, फळबाग लागवड, विहिर पुनर्भरण इत्यादी.
सार्वजनिक बांधकाम विभाग	रस्ते, वृक्ष लागवड इत्यादी.
पाटबंधारे विभाग	पाझर तलाव /गाव तलाव मधील गाळ काढणे, तलावाची दुरूस्ती, नवीन पाझर तलाव, वृक्ष लागवड, रोपवाटीका, माती नालाबांध, नाला सरळीकरण, कालवे दुरूस्ती, इत्यादी.
सामाजिक वनीकरण	सी.सी.टी., वृक्ष लागवड, रोपवाटीका इत्यादी.
वन विभाग	सी.सी.टी./ वन तलाव, वृक्ष लागवड, रोपवाटीका, जाळ रेषा काढणे इत्यादी.

- नरेगा अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर व तालुका स्तरावर होणाऱ्या कामाचे स्वरूप:-

(१) योजनेंतर्गत मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार देण्यासोबतच गावातील पायाभूत सोयींच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जलसंधारण, वृक्षरोपण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्रय रेषेखालील शेतकरी तसेच इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीचा विकास करणे आणि गावातील अंतर्गत रस्ते, पांदण रस्ते इत्यादी कामांचा वार्षिक आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची दक्षता घेतली जाते.

(२) कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना मागील वर्षात निर्माण झालेले मनुष्यदिवस, रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबाची संख्या, प्रति कुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती, मजुरी दर (कुशल व साहित्यावरील खर्च) इत्यादी बाबी विचारात घेणे.

(३) योतनेंतर्गत पुढील आर्थिक वर्षात ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात, ग्रामपंचायतीमार्फत व इतर यंत्रणेमार्फत करावयाच्या कामाचे नियोजन करून, शेल्फवर ठेवण्याच्या कामाची यादी तयार करण्यात येते व नियोजित दिवशी १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेऊन त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कामांना मंजुरी प्राप्त करुन घेण्यात येते.

जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायत स्तरावर व तालूका स्तरावर नियोजित केलेली कामे पूर्ण झाली आहेत काय ? नसल्यास ती कोणती कामे आहेत व कामे पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत ? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, नियोजित केलेली संपूर्ण कामे ही मजूरांच्या मागणीवर अवलंबून आहेत. मजूरांच्या मागणीनुसार कामे केली जातात. चालू वर्षी ११.७१ कोटी रूपयांची कामे झाली असून ३.६४ लाख इतके मनुष्यदिवस रोजगार निर्मिती उपलब्ध झाली होती. ग्रामपंचायती मार्फत वित्तीय वर्ष सुरू होण्यापूर्वी करावयाच्या कामांचा वार्षिक आराखडा तयार केला जातो. सर्व नागरीक व ग्रामपंचायत सदस्य यांच्याद्वारे आवश्यक असलेली कामे ठरविली जातात. सदरहू नियोजन फार मोठे असते. आवश्यक असलेली कामे करण्याकरीता किती मजूर अपेक्षित आहेत व प्रत्यक्षात किती मजूर मिळतील हे सर्व पाहिले जाते. ज्याप्रमाणे मजूर उपलब्ध होतील त्याप्रमाणे काम केले जाते. निधीची कमतरता भासू नये म्हणून जुलै २०१४ पर्यंत ६,३०,००० एवढे मजूर दाखविण्यात आले होते. तसेच ३,६४,११५ इतक्या मजूरांनी कामे केलेली आहेत. मजूरांनी कामाची मागणी केली आणि त्यांना काम देऊ शकलो नाही असे कधीही झालेले नाही. यासंदर्भात विभागीय सचिव यांनीही अशी माहिती दिली की, रोहयोचे काम इतर योजनांपेक्षा वेगळे आहे. या योजनेमध्ये सर्वसाधारणपणे १५ ऑगस्ट रोजी पुढील आर्थिक वर्षाच्या कामांना मंजूरी दिली जाते. ठरविलेल्या कामांसाठी किती मजूर लागतील याचा अंदाज घेण्यात येतो. प्रत्यक्षात ठरविल्यानूसार काम होत नाही. काही वर्षी जास्त काम होते तर काही वर्षी कमी काम होते. मागणी पाहून निधी दिला जातो.

रोजगार हमी योजनेची कामे केवळ कागदावरच दाखविली जातात. प्रत्यक्षात काम होत नाही. काम झाले तर योग्य होत नाही. कामांची तपासणी व्यवस्थित केली जात नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण रहात नाही. शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. परंतु त्याचा उपयोग योग्य रितीने केला जात नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिव यांनी सांगितले की, बुलढाणा जिल्ह्यामध्ये सामाजिक

वनीकरणाचे काम अतिशय चांगल्या प्रकारे केलेले आहे. अमरावतीला देखील सदरहू काम सुरु केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये २ हजार ते ३ हजार कि.मी. पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा सामाजिक वनीकरणामार्फत झाडे लावली आहेत आणि ती झाडे ८० ते ९० टक्के जिवंत आहेत. या कामी काही निवृत्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. या दृच्छिक (रँडम) पद्धतीने त्यांना त्या ठिकाणी पाठविण्यात येते, कामाच्या तपासण्या केल्या जातात. सोलापूर जिल्ह्यामध्ये देखील हे काम सुरु आहे. सोलापूर जिल्ह्याची अधिकची माहिती देताना प्रभारी उप अभियंता, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी असे सांगितले की, जिल्ह्यातील कामांच्या तपासणीसाठी शासनाद्वारे तपासणी अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. नरेगा आयुक्तांकडून १० कामांना मान्यता देण्यात येते. त्यानुसार उत्तर सोलापूर मधील १० कामे आहे. त्या १० कामांमध्ये वृक्ष लागवड रोपवाटीका, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लागवड इत्यादी कामे करावयाची आहेत. येत्या २४ ऑगस्ट रोजी या १० कामांची तपासणी करण्याकरिता संबंधित अधिकारी येणार आहेत. त्यांच्याकडे आठवड्याचा कार्यक्रम निश्चित केलेला असतो. त्यावेळी उप अभियंता, रोहयो यांनी उपस्थित राहणे आवश्यक असते.

सदर प्रकरणी विभागीय सचिव यांनी अशी माहिती दिली की, नरेगा ही जुन्या ईजीएस सारखी योजना नाही. यामध्ये फार मोठा बदल झालेला आहे. यामधील मजुरांना देण्यात येणारी मजुरी रोख रकमेद्वारे देण्यात येत नसून, ती त्यांच्या खात्यात जमा होते. तसेच तहसिलदार, गट विकास अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यांचे अकाऊंट हाताळले जात नाही. सुरुवातीला नागपूर येथून पैसे काढले जाऊन ते मजूरांच्या बँक खात्यामध्ये जमा केले जातात. प्रत्येक जिल्ह्याकरिता तक्रार निवारण अधिकारी नेमलेले आहेत. आता मजूरांना इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे मजूरी दिली जाते. मजूरांना १५ दिवसाच्या आत मजूरी मिळतेच असे नाही, परंतु ३० दिवसाच्या आत ७० टक्के मजूरी त्यांच्या बचत खात्यामध्ये जमा केली जाते. जानेवारी, २०१५ पासून यामध्ये १ दिवस विलंब झाला तर त्याचा दर ०.०५ टक्के व्याजासहित विलंबाने मजूरी दिली जाणार आहे. काही जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात कामे झाल्याचे दिसून येते तर काही जिल्ह्यामध्ये कमी कामे झाल्याचे दिसून येते. नागपूर विभागामध्ये चांगल्या प्रकारे कामे होत आहेत. अमरावती आणि मेळघाट मधील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कामे सुरु आहेत.

वार्षिक आराखड्यात यंत्रणानिहाय कामे न घेण्याची कारणे कोणती आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, यंत्रणानिहाय कामे घेतली जातात, ग्रामपंयातीकडून काही कामे येतात. या कामांचे पहिल्या प्रथम पंचायत समितीस्तरावर एकत्रिकरण होते. त्यानंतर जिल्हा परिषदस्तरावर त्या कामांना मंजुरी दिली जाते. तहसीलदार स्तरावर यंत्रणानिहाय कामे नियोजनामध्ये समाविष्ट केली जातात. त्यामुळे सर्वच यंत्रणाकडून कामे येत असल्यामुळे यंत्रणानिहाय कामे होत नाहीत, असे म्हणणे चुकीचे आहे. यामध्ये सर्वात महत्वाची भूमिका ग्रामपंचायतीची असते. सर्वच यंत्रणांनी सुचविलेली कामे प्रस्तावित केली जातात.

समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामपंचायतीस्तरावर चांगल्याप्रकारे कामे होतात किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीस्तरावरील कामांचा दर्जा अतिशय चांगला असतो. त्या ठिकाणी ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती केलेली असते.

ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक किंवा तांत्रिक अधिकारी/कर्मचाऱ्यांची कमतरता भासते हा मुख्य प्रश्न असतो. ग्रामसेवकांनी गावातच वास्तव्य करणे अपेक्षित आहे किंवा कसे याबाबत समितीने विचारले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक कार्यरत असतो. त्याच्याकडे गावातील कामांची जबाबदारी सोपविलेली असते. प्रत्येक जिल्हा परिषदेत ग्रामरोजगार सेवक कार्यरत आहेत. तसेच विभागीय सचिव यांनी सांगितले की, ग्रामसेवकांचा संबंध ग्रामविकास विभागाशी येत असतो. रोजगार हमी योजनेशी त्याचा थेट संबंध येत नाही. तलाठी आणि ग्रामसेवकांचे गावातच वास्तव्य असणे अपेक्षित असते, पण तसे होत नाही.

ग्रामपंचायतीने ५० टक्के आणि यंत्रणांनी ५० टक्के कामे करणे अपेक्षित असते. अनेक वेळा कृषी विभाग आणि पाटबंधारे विभागामार्फत मजूरांना कामे दिली जातात. पण अशा प्रकारची कार्यवाही ज्या वेगाने व्हायला पाहिजे, तशा पध्दतीने ती होत नाही, हे समितीला दौऱ्याच्या वेळी प्रकर्षाने निदर्शनास आले होते. त्यामुळे यासंदर्भात प्रधान सचिवांनी ग्रामसेवकांना तसेच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश देण्याची गरज आहे. शेल्फवरील कामे प्रत्यक्षात उतरल्याचे दिसून येत नाहीत असे समितीने स्पष्ट केले असता, विभागीय सचिव यांनी सांगितले की, समितीने केलेल्या सूचनेनुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी यंत्रणांनी केलेली उपाययोजना अपुरी का पडली व ती सुधारण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले ? नरेगा अंतर्गत योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मजूर उपलब्ध झाले काय ? अशी समितीने विचारणा केली त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, रोजगार हमी योजना बंद झाल्यानंतर नरेगा सुरु झाली. या योजनेंतर्गत सुरवातीला अतिशय नगन्य खर्च झाला होता. त्यानंतर मात्र सदर योजनेवरील खर्चाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली, आवश्यक ते प्रयत्न केल्यानंतरच विभागाला यश मिळाले होते. या योजनेवर सुरवातीला साधारणपणे ९ लाख रूपये इतका खर्च करण्यात आला होता. सन २०१२-२०१३ मध्ये दुष्काळ पडलेला होता, त्यावेळी विभागाने ७८.६२ लाख रूपयांचा खर्च केला होता. तेव्हा २८ लाख मनुष्यदिवस इतकी रोजगारनिर्मिती झाली होती. त्यानंतर सन २०१३-१४ मध्ये ३९ कोटी १९ लाख रुपये खर्च झालेला होता. तेव्हा १० लाख ४७ हजार मनुष्यदिवस इतकी रोजगार निर्मिती झाली होती. चालू वर्षी सुरुवातीच्या ४ महिन्यांच्या कालावधीत ११ कोटी ७१ लाख रूपयांचा सदर योजनेवर खर्च केलेला आहे. आता ३.६४ लाख मनुष्यदिवस इतकी रोजगारनिर्मिती झाली आहे. अशा प्रकारे विभागाने केलेल्या प्रयत्नांना यश येत आहे. यासंदर्भात विभागीय सचिव यांनीही अशी माहिती दिली की, विभागाने ४ ते ५ उपक्रम प्रसिध्दीसाठी राबविले होते. "जॉबकार्ड" देण्यासाठी

संबंधित मजूराकडून अर्जाची अपेक्षा असते. २६ जानेवारी रोजी विशेष मोहिम राबविली जाते. ग्रामपंचायतीच्या भिंतीवर जाहीरात दिली जाते. त्यावर मजूरीच्या दराची माहिती तसेच किती कामे केली आणि किती कामे उपलब्ध आहे याबाबतची माहिती दिली जाते. मजूरांनी काम केल्यानंतर ग्रामपंचायतीमधील संगणकावर वेतन चिठ्ठी उपलब्ध होते. संबंधित मजूराला मजूरी देण्यास १५ दिवसापेक्षा जास्त विलंब झालेला असेल तर अशा वेळेस त्याला ०.०५ टक्के व्याजासहित मजूरी दिली जाते. तसेच जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, मे महिन्यात ५०,४५६ मजूरांना, जून महिन्यात ५२,२३० मजूरांना आणि जुलै महिन्यात ५,९६६ मजूरांना मजुरी देण्यास विलंब झाल्यामुळे अशा सर्व मजुरांना ०.०५ टक्के व्याजासहित मजुरी दिलेली आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सुरुवातीच्या काळात रोजगार हमी योजनेची कामे कमी प्रमाणात होती. परंतु, राज्याच्या मुख्य सचिवांपासून ते कनिष्ठ अधिकाऱ्यांनी या योजनेत लक्ष घातल्यानंतर निधीच्या प्रमाणात तसेच मजूर आणि त्यांच्या कामाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली होती. सोलापूर जिल्ह्यात या विषयाच्या संदर्भात आढावा बैठक झाली होती. त्यामध्ये काही दुरुस्त्या करुन सदर योजनेला चालना देण्याचा प्रयत्न केला होता. गरीब माणसांना जॉबकार्ड मिळवून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची गरज आहे. परंतु, जॉबकार्ड काढण्याचे काम हे विनापैशाचे असल्यामुळे बँका याकडे दुर्लक्ष करीत असतात. रोजगार हमी योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळतो. संबंधित मजूरांना जोपर्यंत जॉबकार्ड मिळत नाही, तोपर्यंत फिल्डवरील कामांना सुरुवात होत नाही असे समितीने स्पष्ट केले. यासंदर्भात गट विकास अधिकारी, मग्रारोहयो, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सांगितले की, सुरुवातीला मजूरांना कामांची मागणी ग्रामपंचायतीकडे करावी लागते. कामाच्या मागणीचा अर्ज पंचायत समितीकडे पाठविला जातो. पंचायत समितीने संबंधित मजूराला काम द्या असे म्हटल्यानंतर जॉबकार्डची तयारी केली जाते. जॉबकार्ड बँकेतून दिले जात नाही. जॉबकार्ड मिळाल्यानंतर मजूराची मजूरी त्याच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाते. मजूराचे खाते हे पोस्टात किंवा राष्ट्रीयकृत बँकेत काढणे अपेक्षित आहे. परंतु, संबंधित मजूराला बँकेत खाते उघडताना अनेक अडचणी येतात, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत समितीने असे निदर्शनास आणून दिले की, संबंधित मजूर कामाच्या ठिकाणी गैरहजर राहून बँकेत खाते उघडण्यासाठी जातो, त्यावेळी काही बँकाकडून आवश्यक त्या कागदपत्रांची मागणी केली जाते. मजुरांना कामाच्या ठिकाणी वारंवार गैरहजर राहून बँकेत खाते उघडण्यासाठी जाणे हे मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. यासंदर्भात विभागीय सचिव यांनी सांगितले की, संबंधित मजुरांना बँकेत किंवा पोस्टात देखील खाते उघडता येते. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, त्यांच्या आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर तीन महिन्यांनी बँकर्सची एक बैठक आयोजित केली जाते तेव्हा हा विषय कार्यक्रमपत्रिकेवर प्राधान्याने घेणार आहे. समितीने पुढे स्पष्ट केले की, जॉबकार्ड काढत असताना संबंधित मजुरांना कोणताही त्रास होणार नाही, अशा लेखी सूचना जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना देण्याची गरज आहे.

अभिप्राय व शिफारशी :

समितीला सादर करण्यात आलेल्या कामाच्या वार्षिक नियोजन आराखडयाच्या माहितीमध्ये विसंगती व त्रुटी राहिल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून समितीला परिपूर्ण व अचुक माहिती दिली नाही. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये मगांराग्रारोहयोसाठी एकत्रित पुरवणी वार्षिक नियोजन आराखडयात ग्रामपंचायत स्तरावर व यंत्रणा स्तरावर घेण्यात आलेल्या कामामध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सामाजिक वनीकरण व वन विभागाची कामे वेगळी दाखवावयास पाहिजे होती. सामाजिक वनीकरण व वन विभागाची कामे एकत्रित दाखविता येत नाहीत. त्याचप्रमाणे जिल्हापरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा कार्यक्रम एकत्रित दर्शविला आहे. **जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करावयाच्या कामाचे स्वरूप वेगवेगळे असून या विभागांची कामे एकत्रित दाखविल्यामुळे समितीस परिपूर्ण माहिती मिळू शकली नाही. सामाजिक वनीकरणाची कामे व वन विभागाची कामे वेगवेगळी करावीत व तशा प्रकारचे नियोजन करावे. पाटबंधारे विभागांतर्गत दर्शविण्यात आलेल्या कामांवरील खर्चाच्या टक्केवारीची माहिती संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडून न देण्यात आल्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.**

सन २००९-१० ते २०१३-१४ या आर्थिक वर्षात वार्षिक नियोजनाची टक्केवारी असमाधानकारक असून संबंधित यंत्रणांनी शासनाच्या विहीत मार्गदर्शक तत्वानुसार कामे घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही, कामाचे वार्षिक नियोजन शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार करणे आवश्यक असताना त्याबाबतीत उचित कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील कामांचे वार्षिक नियोजन असमाधानकारक असल्याचे समितीचे स्पष्ट मत असून यापुढे संबंधित यंत्रणांनी शासनाच्या विहीत मार्गदर्शक तत्वानुसार कामे घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हाधिकारी हे समन्वय समितीचे प्रमुख असतात. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी जॉबकार्ड मिळवून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याची गरज आहे. जॉबकार्ड काढण्याचे काम विनामुल्य असल्यामुळे बँका याकडे दुर्लक्ष करतात. सबंधित मजूरांना जोपर्यंत जॉबकार्ड मिळत नाही तोपर्यंत फिल्डवरील कामांना सुरुवात करता येत नाही. जॉबकार्ड मिळाल्यानंतर मजुरांची मजुरी त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाते. **मजुरांचे खाते पोस्टात किंवा राष्ट्रीयकृत बँकेत काढणे अपेक्षित आहे परंतू सबंधित मजूराला बँकेत खाते उघडताना अनेक अडचणी येतात. त्यादृष्टीने मजूरांना बँकेमध्ये किंवा पोस्टामध्ये खाते उघडताना तसेच जॉबकार्ड मिळण्यासाठी सबंधित मजूरांना कोणताही त्रास होणार नाही. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सबंधितांना लेखी सूचना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

(२) निधी, पुरवठा व खर्च :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "निधी, पुरवठा व खर्च" यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००९-१० ते २०११-१२ या वर्षात निधी शिल्लक राहण्याची कारणे कोणती ? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एमआरईजीएसमध्ये खर्च कमी होता तसेच ही योजना नवीन होती. यंत्रणांना कार्यान्वित व्हायला खूप उशीर लागला होता. दोन वर्षात या कामांवर खर्च कमी होता. कार्यपध्दतीमध्ये सुधारणा होत गेल्यानंतर खर्च वाढला. सन २००९-१० आणि २०१०-११ मध्ये मजूरीचा दर १०५ रुपये इतका होता. त्याचप्रमाणे विहिरी तसेच वैयक्तिक लाभांच्या योजनांच्या खर्चासंबंधी सांगावयाचे झाल्यास त्यावेळी मार्च मध्ये शासन निर्णय निर्गमित झाला होता त्यामुळे खर्च कमी झाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात एमआरईजीएस केव्हा सुरू झाली, तसेच सन २०१३-१४ मध्ये १०.२७ कोटी रुपये खर्च झाला असल्याचे सांगण्यात आले असून आता ३०.८९ कोटी रूपये खर्च झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायती आणि यंत्रणानिहाय झालेल्या खर्चाचा तपशिल देण्याबाबत समितीने सूचित केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, माहे एप्रिल, २००८ पासून सोलापूर जिल्हयात एमआरईजीएस योजना सुरू झाली. माहे ऑक्टोबर, २०१३ अखेर ग्रामपंचायत स्तरावर २५,५४,४३०००/- रूपये आणि यंत्रणा स्तरावर ५,३४,७२,०००/- रूपये खर्च झाला आहे. याबाबत समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतींच्या तुलनेत यंत्रणा स्तरावर ३० टक्क्यांपेक्षा कमी खर्च झाला आहे, याची कारणे काय आहेत, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जास्तीत जास्त कामे ग्रामपचायंतीच्या स्तरावर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासंदर्भात समितीने असा मुद्या उपस्थित केला की, यंत्रणा स्तरावरून कामे केली जात नाहीत. त्यांच्याकडून कामे करून घेणे आवश्यक होते परंतु तसे काही घडले नाही. जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणावर नियत्रंण नाही. परिणामी ग्रामपंचायत स्तरावर २५ कोटी रूपये खर्च करीत असताना त्या तुलनेने यंत्रणा स्तरावर किमान १० कोटी रूपये खर्च करणे आवश्यक होते. परंतु यंत्रणा स्तरावर फक्त ५ कोटी रूपयांपर्यंत खर्च करण्यात आला. याबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत स्तरावर ५० टक्के खर्च करावयाचा असल्यामुळे ग्रामपंचायतींना जास्तीत जास्त कामे करण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्याच प्रमाणे यंत्रणांना कामे दिल्यानंतर त्यांनी ती कामे केली नाहीत, असे घडले नाही.

उपायुक्त (रोहयो) यांनी सोलापूर जिल्हयात कामे सुरू असताना त्या संदर्भात आढावा घेऊन, प्रत्यक्षात साईटवर भेटी देणे व त्या संबंधी डायरीमध्ये नोंद करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारे प्रत्यक्षात किती कामे पाहिली आहेत ? अशी समिती विचारणा केली असता उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, दिनांक १ एप्रिल नंतर ५ जिल्हयांमध्ये एकूण ८९ कामांना भेटी दिल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील कामांना भेटी दिल्याची

विशिष्ट आकडेवारी नाही. अपूर्ण कामे पूर्ण होण्यासाठी ५ जिल्हयांसाठी एकत्रितरित्या १८ बैठका, ३ भेटी तसेच एक कार्यशाळा घेण्यात आली होती. याबाबत समितीने स्पष्ट केले की, या संदर्भात डायरीत नोंद केलेली असल्यास, ती डायरी समितीकडे सादर करावी. सोलापूर जिल्हयाच्या संदर्भात सांगावयाचे झाल्यास कामे सुरू असताना प्रत्यक्षात तेथे भेटी दिलेल्या नाहीत, याबद्दल समितीकडे माहिती आहे. उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, सोलापूरमध्ये सर्व यंत्रणांना एकत्रित बोलावून कामांचा आढावा घेतला होता.

समितीच्या दिनांक १० व ११ जानेवारी, २०१४ रोजी झालेल्या जिल्हा बैठकींच्या वेळी समितीला देण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीने विचारणा केली की, सन २०१४-१५ या वर्षी ११ तालुक्यात नियोजीत केलेल्या कामांची सद्य:स्थिती काय आहे ? जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ११ कोटी ५१ लाख ५६ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. तसेच विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कोणती कामे चालू आहेत, याची माहिती आपल्याला वेबसाईटवरुन पाहता येणार आहे. वेबसाईटवर काम केव्हा सुरु झाले व कामाच्या सद्य:स्थितीची माहिती उपलब्ध होणार आहे.

जिल्हाधिकारी यांनी असे नमूद केले की, ११ तालुकानिहाय झालेल्या खर्चाची तपशिलवार माहिती अशी आहे की, अक्कलकोट तालुक्यामध्ये १,४१,५३,०००/- रुपये खर्च करण्यात आले आहेत. बार्शी तालुक्यामध्ये २,५६,४३,०००/- रुपये, करमाळा तालुक्यामध्ये ८९,२३,०००/- रुपये, माढा तालुक्यामध्ये ४,२१,६०,०००/- रुपये, माळशिरस तालुक्यामध्ये १,९४,०००/- रुपये, मंगळवेढा तालुक्यामध्ये १९,४५,०००/- रुपये, मोहोळ तालुक्यामध्ये ६,४४,०००/- रुपये, पंढरपुर तालुक्यामध्ये ९३,६६,०००/- रुपये, सांगोला तालुक्यामध्ये १५,९९,०००/- रुपये, उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये ६,४८,०००/- रुपये, दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये ८४,७८,०००/- रुपये असे एकूण ११,३७,५५,०००/- रुपयांचा खर्च केलेला आहे. तसेच आस्थापनेचा खर्च मिळून तो ११,७१,५६,०००/- रुपये हा ११ तालुकानिहाय झालेला आहे.

ग्रामपंचायतीमध्ये कोणती कामे चालू आहेत, याची माहिती वेबसाईटवरुन देखील पाहता येणार आहे असे उत्तर प्रधान सचिवांनी दिले होते. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीने कोणती कामे घेतली याची माहिती वेबसाईटवरुन आता समिती कक्षामध्ये पाहता येईल काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव यांनी सांगितले की, नरेगा एमबी डॉट ओआरजी या साईटवर ही सर्व माहिती पाहता येणार आहे. यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, अक्कलकोट तालुक्यामधील चपळगाव येथील माहिती दाखविण्यात यावी. माळशिरस मधील मोहोळ गाव हे बागायती गाव असल्यामुळे तेथे २५० ते ३०० रुपये मजुरांना मजुरी मिळते त्यावर विभागीय सचिव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील फक्त १२२ गावांमध्ये कामे सुरु आहेत. पुढील वर्षात प्रत्येक ग्रामसभेने नियोजन करण्याचे अपेक्षित आहे. पुढे समितीने असे स्पष्ट केले की, शासनाने

स्वीकारलेल्या नवीन धोरणाला राज्यातील ३५५ तालुक्यांच्या ठिकाणी डिजिटल सिस्टिमद्वारे प्रसिध्दी दिली पाहिजे. तालुक्यातील विशिष्ट वर्तमानपत्रातून प्रसिध्दी दिली पाहिजे.

सामाजिक वनीकरण तसेच वन विभागाच्या अंतर्गत सन २००९-१० व २०१०-११ या वर्षात कामाची झालेली सुरुवात, कामावर झालेला खर्च व उपलब्ध मनुष्य दिवस याबाबतची माहिती निरंक दाखविण्याची कारणे कोणती, तसेच या कालावधीत खर्च न होण्याची कारणे काय आहेत, मंजूर रकमेपेक्षा झालेल्या खर्चात मोठी तफावत असण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये १३१ कामे मंजूर झाली होती, त्यापैकी ५५ कामे सुरु झाली आहेत. या कामावर ३१.७७ लाख रुपये इतका खर्च झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये ७८ कामे मंजूर झाली होती, त्यापैकी ६१ कामे सुरु झाली, या कामावर ९३.२६ लाख रुपये इतका खर्च झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये १०० कामे मंजूर झाली होती, त्यापैकी ७७ कामे सुरु झाली व या कामांवर ५५.४१ लाख रुपये इतका खर्च झाला आहे.

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्ष लागवड करण्याच्या कार्यक्रमाचा किती शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे, याबाबतचे किती प्रस्ताव विभागाकडे सादर झाले होते ? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला जात नाही. तसेच विभागीय सचिव यांनी सांगितले की, महिलांना व वयोवृध्दांना वृक्ष संवर्धनाचे काम दिले जाते. त्यांनी संवर्धन केलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण ७०-७५ टक्के असेल तर त्यांना १६० रुपये मजुरी दिली जाते. महिलांना व वृध्दांना सौम्य स्वरुपाचे काम मिळावे या हेतूने ही योजना सुरु केलेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, अधीक्षक अभियंता, भीमा कालवा येथील १२३ कामे व अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर येथील १२८ कामांवर मंजूर असलेल्या रकमेपेक्षा कमी खर्च होण्याची कारणे काय आहेत ? भीमा कालव्याच्या ठिकाणी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षांची माहिती निरंक आहे. भीमा नदीचा मुख्य कालवा २० कि.मी. लांबीचा आहे. या मुख्य कालव्याला उजवा व डावा असे कालवे आहेत. एका कालव्याची रुंदी १५० मीटर व दुसऱ्या कालव्याची रुंदी १६५ मीटर इतकी आहे. या कालव्यांसाठी बरीच जमीन आरक्षित झालेली आहे. ही सर्व जमीन जलसंपदा विभागाची असताना या दोन्ही कालव्याच्या बाजूला वृक्ष लागवडीसाठी कोणीही लक्ष दिलेले नाही. त्या जमिनीवर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेतला तर सोलापूर जिल्ह्यात वर्षभर ५० हजार लोकांना झाडे लावण्याचे काम मिळू शकेल. परंतु या कामासाठी कोणताही ठेकेदार येऊन भेटत नाही. अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी सांगितले की, मुख्य कालव्याचे लाभक्षेत्र व्यवस्थापनाकडे हस्तांतरित झालेले आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये पंप हाऊस, रायजिंग मिलची कामे चालू आहेत. सन २००९-१०

व सन २०१०-११ या वर्षात कामे झाली नाहीत. परंतु सन २०११-१२, सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षात कामे झालेली आहेत.

कालव्याच्या दोन्ही बाजूला व बॅक वॉटर क्षेत्रामध्ये वृक्ष लागवडीचा कार्यक्रम का राबविला नाही ? मोहळ मतदार संघामध्ये ४५ कि.मी.पर्यंत हा कालवा गेलेला आहे. त्या भागातील कालव्यातून मागील ४० वर्षांपासून पाणी जात आहे. या कालव्याच्या दोन्ही बाजूला माती काढून टाकल्यानंतर तेथे वृक्ष लागवड होणे आवश्यक होते. शासनाने संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे. त्यामुळे तेथील एकही शेतकरी वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या आड आलेला नाही किंवा त्यांनी त्या जागेवर हक्क सांगितलेला नाही. ही वस्तुस्थिती असताना वृक्ष लागवड न होण्याचे कारण काय ? अशी समितीने विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर यांनी सांगितले की, मुख्य कालव्याच्या बाजूला बरीच झाडे शिल्लक आहेत. जलसंपदा विभागाचे नाव या जमिनीच्या रेकॉर्डवर नमूद केलेले नाही. परंतु, त्याबाबतची प्रक्रिया सुरु केलेली आहे. अनेक जमिनींचे अवॉर्ड झालेले आहेत. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, मागील एका वर्षामध्ये ५००० अवॉर्डवर शासनाचे नाव लावण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली होती. त्यापैकी ३५०० अवॉर्डवर सरकारचे नाव लावण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. या संदर्भातील प्रक्रिया तहसीलदारांच्या माध्यमातून पार पाडली जाते. संपादित केलेल्या जमिनीवर नाव लावण्याची कार्यवाही राहिलेली आहे ती पूर्ण करुन हा प्रश्न सोडविण्यात येईल. याबाबत समितीने सूचित केले की, संबंधित अधिकाऱ्यांना येत्या ४ महिन्यांमध्ये १ लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल प्रधान सचिवांना पाठवावा. यावर विभागीय सचिव यांनी सांगितले की, समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे संबंधितांना कळविण्यात येईल.

सोलापूर जिल्ह्यामध्ये जॉब कार्डधारक किती आहेत, जॉबकार्डधारकांकडून कामाची मागणी येत नसेल तर जॉब कार्ड रद्द करण्याबाबत विभागाने उपाययोजना केली आहे काय ? असे समितीने विचारले असता त्यावर अधीक्षक अभियंता, भीमा पाटबंधारे मंडळ, सोलापूर यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये जिल्ह्यात १२३ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती, त्यापैकी २ कामे पूर्ण झालेली आहेत. या कामांवर २.९६ लाख रुपये इतका खर्च झाला असून त्यातून १,४९७ मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. सन २०१२-१३ मध्ये १२१ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती, यापैकी ५ कामे पूर्ण झाली आहेत, या कामांवर ४.६३ लाख रुपये इतका खर्च झाला आहे, यातून २४६५ मनुष्य दिवस निर्माण झाले आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २०११-१२ मध्ये १२३ कामांपैकी केवळ २ कामे व सन २०१२-१३ मध्ये १२१ कामांपैकी फक्त ५ कामे पूर्ण झाली आहेत, इतक्या कमी संख्येने कामे पूर्ण होण्याची कारणे काय आहेत ? अधीक्षक अभियंता, भीमा पाटबंधारे मंडळ, सोलापूर यांनी सांगितले की, रोजगार हमी योजनेच्या कामांवर मजूर उपलब्ध होण्यासाठी गावातील

सरपंच व उपसरपंचांनी दवंडी देऊनही मजूर उपलब्ध झाले नाहीत. या सर्व कामांची अंदाजपत्रके मंजूर झालेली आहेत, पण मजुरांअभावी कामे पूर्ण झालेली नाहीत.

जिल्ह्यात किती जॉब कार्ड वितरित केलेली आहेत ? जॉब कार्ड देण्याची कार्य पध्दती कशी आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिव यांनी सांगितले की, २ लाख ८२ हजार जॉब कार्ड वितरित केली आहेत. प्रत्येक जॉब कार्डावर विशिष्ट नंबर दिलेला असतो. त्या जॉब कार्डामुळे मजुराचे नाव, कुटुंब प्रमुखाचे नाव, मजुराने केलेल्या कामाची व त्याला मिळालेली मजुरी ही सर्व माहिती मिळू शकते. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एखाद्या व्यक्तीने वा कुटुंबाने जॉब कार्ड मिळण्याबाबत ग्रामपंचायतीला विनंती केल्यानंतर त्यांना जॉब कार्ड दिले जाते. त्यानंतर त्यांनी कामाची मागणी केल्यास ते मजुरीचा क्लेम करु शकतात.

जलसंपदा विभाग, कृषी विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग या तिन्ही विभागांमध्ये उप अभियंते असतात. प्रत्येक उप अभियंत्यांच्या अंतर्गत ४ ते ६ कनिष्ठ अभियंते कार्यरत असतात. तिन्ही विभागातील कनिष्ठ अभियंत्यांची एकत्रित संख्या १५० इतकी होईल. या प्रत्येक कनिष्ठ अभियंत्यांनी रोजगार हमी योजनेची किमान ५ कामे केली पाहिजेत. रोजगार हमी योजनेच्या कामांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात चर्चा केली जाते, तहसीलदार कार्यालयात, तालुक्याच्या समितीमध्ये चर्चा होते. परंतु, जलसंपदा, कृषी व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत आकर्षण वाटत नाही असे समितीने स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००९-२०१० ते २०११-२०१२ या वर्षात सोलापूर जिल्हयामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत खर्च कमी प्रमाणात करण्यात आल्यामुळे निधी शिल्लक राहिलेला आहे. ऑक्टोबर, २०१३ अखेरपर्यंत ग्रामपंचायत स्तरावर रुपये २५,५४,४३,०००/- आणि यंत्रणा स्तरावर रुपये ५,३४,७२,०००/- इतका खर्च झालेला आहे. म्हणजेच ग्रामपंचायतीच्या तुलनेत यंत्रणा स्तरावर ३०% पेक्षा कमी खर्च झालेला आहे. याचा अर्थ यंत्रणा स्तरावरुन कामे केली जात नाहीत. यंत्रणा स्तरावर कोणतेही नियंत्रण नाही. **ग्रामपंचायत स्तरावर २५ कोटी रुपये खर्च करीत असताना त्या तुलनेत यंत्रणा स्तरावर किमान १० कोटी रुपये खर्च करणे आवश्यक आहे. परंतु यंत्रणा स्तरावर फक्त ५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे ही बाब निश्चितच योग्य नाही. तरी, यापुढे ग्रामपंचायत स्तरावर व यंत्रणा स्तरावरुन करावयाच्या कामाचा व खर्चाचा शासनाच्या नियमानुसार योग्य प्रकारे ताळमेळ घालण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, अशी समितीची शिफारस आहे.**

(३) मजुरांच्या सोयी सवलतींवर करण्यात आलेला खर्च :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "मजूरांच्या सोयी सवलतीवर करण्यात आलेला खर्च" या सदंर्भात समितीने विचारणा केली की, गट विकास अधिकारी, मंगळवेढा, बार्शी व माळशिरस यांनी मजुरांच्या सोयीसवलतीवर खर्च न करण्याची कारणे काय आहेत ? त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, सन २००९-१० आणि २०१०-११ मध्ये राज्यातील अनेक जिल्हे आणि तालुक्यांमध्ये मजुरांच्या सोयीसवलतीवर कमी खर्च झाला आहे. महत्वाचे कारण असे आहे की, त्यावेळी मजुरीचा दर १०५ रूपये होता. तसेच उत्तर सोलापूर शहराच्या आजूबाजूला ३५ ते ३६ ग्रामपंचायती आहेत. तसेच शहरात एमआयडीसी असल्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत होता. त्याचप्रमाणे सुरूवातीच्या काळात जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतींना योजनेची सविस्तर माहिती नव्हती. त्यावेळच्या परिस्थितीचा विचार केल्यास यंत्रणानी केलेल्या कामानुसार खर्च करण्यात आला आहे. ज्यावेळी कामे नव्हती त्यावेळी यंत्रणांना निधी दिलेला नाही. यासंदर्भात उपायुक्तांनी अशी माहिती दिली की, पुणे विभागातील ५ जिल्हयांमध्ये २ कोटी रूपये खर्च झाला होता. त्यात १.५२ कोटी रूपये प्रशासकीय खर्च व ४८ लाख रूपये कामांवर खर्च करण्यात आले होते. त्यानंतर प्रशाकीय कामांवर १.४० कोटी रूपये व २.४० कोटी रूपये कामांवर खर्च करण्यात आले आहेत.

मजुरांच्या सोयी सवलतीवर शासन निर्णयानुसार ३ टक्के खर्च करणे आवश्यक असताना कोणत्याही वर्षी ३ टक्के खर्च न केल्याची कारणे काय आहेत ? लेखी स्पष्टीकरणात मजुरांच्या सोयी सवलतीवर केलेल्या खर्चाच्या टक्केवारी शून्य दर्शविलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, लेखी स्पष्टीकरणातील मजुरांच्या सोयी सवलतीवर केलेल्या खर्चाच्या आकडेवारीचा विचार करता ती ३ टक्क्यांपेक्षा कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. जुन्या आणि नवीन योजनेत असा फरक आहे की, पूर्वी वैयक्तिक लाभाच्या योजना न घेता मोठमोठी कामे घेतली जात होती. त्यामुळे मजुरांची संख्या जास्त असायची. दिनांक २६ ऑगस्ट, २००३ च्या शासन निर्णयानुसार कृषी, वन किंवा सामाजिक वनीकरण विभागांची कामे पूर्ण करण्यासाठी १५ ते २० दिवसांचा कालावधी असल्यामुळे तेथे मजुरांसाठी निवारा करण्याची गरज नाही, त्यांनी झाडाचा निवारा घ्यावा. आवश्यकतेनुसार ज्या ठिकाणी मजुरांना निवाऱ्याची गरज आहे तेथे तशी सोय करून सोयीसवलतींवर खर्च केलेला आहे. त्यामुळे मजुरांच्या सोयीसवलतींवर खर्च कमी झाला आहे. समितीने पुढे अशी विचारणा की, सन २००९-१० ते २०१३-१४ च्या वर्षनिहाय गोषवाऱ्यात पाणी पुरवठ्यासाठी लावण्यात आलेल्या बैलगाड्यांचा खर्च १.६० लक्ष रूपये, मजुरांच्या सुविधेवर ७३.६१ लक्ष रूपये आणि एकूण कामांवरील खर्च ७७९४.५० लक्ष रूपये दर्शविलेला आहे. कामांवरील खर्चाच्या तुलनेत मजुरांच्या सुविधेवर फक्त १.६० लक्ष रूपये का खर्च करण्यात आले ? त्यावर जिल्हाधिकायांनी सांगितले की, ज्या ज्या ठिकाणी आवश्यक होता तेथे मजुरांच्या सोयीसवलतींवर खर्च करण्यात आला आहे. मजुरांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी नेमण्यात आलेल्या

मजुरांवरील खर्च आणि पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी लावण्यात आलेल्या बैलगाडीवरील खर्चाची माहिती परिशिष्ट - एक मध्ये नमूद केलेली आहे.

सन २०१२-१३ मध्ये सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ होता. सन २०१२-१३ मध्ये मजुरांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी लावण्यात आलेल्या बैलगाडीवर फक्त १.६० लाख रुपये खर्च झालेले आहेत असे समितीनी विचारले असता जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, मजुरांच्या सोयी सवलतींवर ३ टक्क्यापर्यंत खर्च करावयाचा असतो. मजुरांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी नेमण्यात आलेल्या मजुरांवर १४.५० लाख रुपये खर्च झालेले आहेत आणि पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी लावण्यात आलेल्या बैलगाडीवर १.६० लाख रुपये खर्च झालेले आहेत. समितीने पुढे अशीही विचारणा की, सन २०१२-१३ मध्ये कामावरील एकूण खर्च ७८ कोटी रुपये दाखविलेला आहे. एकूण खर्चाच्या ३ टक्के म्हणजे २ कोटी ४० लाख रुपये मजुरांच्या सोयी सवलतींवर खर्च व्हावयास पाहिजे होते. परंतु मजुरांच्या सोयी सवलतींवर फक्त १६ ते १७ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २०१२-१३ मध्ये मजुरांच्या सोयी सवलतींवर ७३.६१ लाख रुपये खर्च झालेले आहेत. मजुरांच्या सोयी सवलतींवर कमी खर्च झाला तर त्याचा मजुरांच्या उपस्थितीवर देखील परिणाम होतो. मजुरांना जास्तीत जास्त सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्या तर मजुरांच्या उपस्थितीमध्ये वाढ होऊ शकते. ग्रामपंचायत आणि यंत्रणेने आढावा घेऊन मजुरांना जास्तीत जास्त सोयी सवलती पुरविण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००९-१० आणि २०१०-११ मध्ये राज्यातील अनेक जिल्हे व तालुक्यामध्ये मजुरांच्या सोयी सवलतींवर कमी खर्च झालेला आहे. तसेच सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा, बार्शी व माळशिरस तालुक्यात मजूरांच्या सोयी सवलतींवर कमी खर्च झालेला आहे. शासन निर्णयानुसार मजुरांच्या सोयी सवलतीवर ३ टक्के रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. सन २००९-१० ते २०१३-१४ च्या वर्षानिहाय गोषवाऱ्यात पाणी पुरवठ्यासाठी लावण्यात आलेल्या बैल गाडयांचा खर्च १.६० लक्ष रुपये, मजुरांच्या सोयी सुविधावरील खर्च ७३.६१ लक्ष रुपये दर्शविलेला आहे. कामावरील खर्चाच्या तुलनेत मजुरांच्या सुविधेवरील खर्च फक्त १.६० लक्ष रुपये झालेला आहे. **सन २०१२-१३ मध्ये कामावरील खर्च ७८ कोटी रुपये दाखविलेला आहे. एकूण खर्चाच्या ३ टक्के म्हणजे २ कोटी ४० लाख रुपये खर्च करणे आवश्यक होते. परंतू मजुरांच्या सोयी सवलतीवर फक्त १६ ते १७ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत, ही बाब निश्चितच योग्य नाही. मजुरांच्या सोयी सवलतीवर कमी खर्च झाला तर त्याचा परिणाम मजुरांच्या उपस्थितीवर होतो. काम करत असताना मजुरांना हेल्मेट, मास्क, हॅन्डग्लोज, वैद्यकीय मदत(First Aid Box) तसेच पिण्यासाठी निर्जंतुक पाणी इत्यादी अत्यावश्यक सोयी सुविधा पुरविल्या पाहिजे. पुमजुरांना जास्तीत जास्त सोयी सवलती दिल्या तर मजुरांच्या उपस्थितीत वाढ होते. तरी यापुढे रोजगार हमी**

योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांवर शासन निर्णयानुसार ३ टक्के रक्कम खर्च करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) मजुरीचे वाटप :-

समितीला जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "मजुरीचे वाटप" यांसदर्भात सन २०११-१२ मध्ये मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या हजेरीपटांची संख्या १०,७७६ असल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणातील मजुरी वाटपाच्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई प्रस्तावित केलेली आहे ? असे समितीने विचारले असता जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, मजुरी वाटपास झालेल्या विलंबाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केलेली असून त्यांनी त्यासंदर्भात ४-५ कारणे सांगितली आहेत. एम.बी. रेकॉर्डमध्ये कामाच्या मोजमापाची नोंद घेतली जाते. परंतु एखाद्या गावात ४-५ कामे सुरु असतील आणि एम.बी. रेकॉर्ड पंचायत समितीमध्ये गेले तर पुढील काम ब्लॉक होत होते. आता प्रत्येक कामाचे स्वतंत्र एम.बी. रेकॉर्ड ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता ही अडचण दूर झालेली आहे. दुसरे म्हणजे, त्यावेळी एमआयएस ही नवीन प्रणाली होती. एमआयएसवर खर्चाची नोंद घेतल्याशिवाय पुढील हप्ता मिळत नव्हता. समितीने पुढे अशी विचारणा केली की, आता ऑनलाईन सर्व प्रक्रिया झाल्यामुळे आता काय परिस्थिती आहे ? त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, मजुरी वाटपास झालेल्या विलंबाची माहिती परिशिष्ट - चार मध्ये नमूद केलेली आहे. मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेले १,१४७ हजेरीपट आहेत. मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या माढा आणि करमाळा तालुक्यात जास्त आहे. माढा आणि करमाळा तालुक्यात विहिरींची कामे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत. काही ठिकाणी मजुरी वाटपास जास्त विलंब झालेला आहे, यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न जिल्हा यंत्रणेकडून करण्यात येईल.

सन २०१२-१३ मध्ये मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या ८,३१८ असल्याचे परिशिष्ट - चार मध्ये नमूद केलेले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २००८ मध्ये सुरु झालेली आहे. त्यावेळी ही योजना नवीन असल्यामुळे सन २००८-०९, २००९-१० मध्ये मजुरी वाटपास विलंब झाला असता तर त्याबाबत समिती समजू शकते. परंतु सन २०१२-१३ मध्ये मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरी पटांची संख्या ८,३१८ इतकी आहे. आपण मजुरांना काम उपलब्ध करुन देण्याची हमी देतो, संबंधित ग्रामपंचायतीमध्ये फलक लावतो. परंतु मजुरांना जर ५ आठवडे मजुरी मिळणार नसेल तर ते बरोबर नाही. जिल्हाधिकारी म्हणून आपण या संदर्भात कोणती कार्यवाही केलेली आहे. मजुरी वाटपास असे २ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झाला तर संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे असे समितीने सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, ही सिस्टीम फास्ट

करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही सर्व तालुक्यातील कामांचे ई-मस्टर सुरु केलेले आहे. पूर्वी एखाद्या गावात जास्त कामे सुरु असली तरी त्यासाठी एकच एम.बी. रेकॉर्ड वापरले जात होते. आता प्रत्येक कामाचे स्वतंत्र एम.बी. रेकॉर्ड केलेले आहे.

मोहोळ तालुक्यात मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या २,६२७ इतकी आहे. मजुरांना जर ५ आठवडे मजुरी मिळणार नसेल तर मजूर कामावर कसे येतील ? असे समितीने विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, ४-५ पालक तांत्रिक अधिकारी असतात आणि त्यांच्या मदतीसाठी पॅनल तांत्रिक अधिकारी असतात. पुढे समितीने अशीही विचारणा केली की, आपण तांत्रिक अधिकाऱ्यांचे कारण सांगून मजुरांना ५ आठवडे मजूरीपासून वंचित कसे ठेऊ शकता ? जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कंत्राटी पद्धतीने तांत्रिक अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार दिलेले आहेत. मोहोळ तालुक्यात मजुरी वाटपास ५ आठवड्यापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या २,६२७ इतकी आहे. मोहोळ तालुक्यात तांत्रिक अधिकारी उपलब्ध करुन देऊन मजुरांना वेळेवर मजुरी उपलब्ध करुन देणे हे आपले काम नव्हते काय ? त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले की, सन २०१२-१३ मध्ये माढा तालुक्यात १,३४४ आणि मोहोळ तालुक्यात १,३६७ कामे सुरु झाली होती. माढा आणि मोहोळ तालुक्यात मोठया प्रमाणावर कामे सुरु झाल्यामुळे त्या कामांचे मोजमाप घेण्यास विलंब झालेला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २००८ मध्ये सुरु झालेली आहे. त्यावेळी निधीचा पुरवठा अपुरा होता, एम.बी. रेकॉर्ड करण्यास कर्मचारी अपुरे होते. त्यामुळे मजुरांना विलंबाने पेमेंट दिले गेले. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार हे कार्यक्रम अधिकारी असतात. मजुरांना वेळेवर मजुरी देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. परंतु गट विकास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. गट विकास अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात आली ? याबाबतची माहिती सदरहु बैठकीत समितीला देण्यात आली नाही.

जिल्हा बैठकीत आश्वासित केल्यानुसार समितीला पुढील प्रमाणे आश्वासित माहिती प्राप्त झाली :-

❖ मजूरी वाटपास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ? त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले ?

- मजूरी वाटपास झालेल्या विलंबाची कारणे-

(१) यापूर्वी सदर योजनेत निधीच्या मागणीची व त्याच्या वाटपाची कार्यपध्दती आतापेक्षा वेगळी व नवीन होती.

I) तांत्रिक अधिकारी यांची संख्या पुरेशी नव्हती.

II) सन २०११-१२ मध्ये जिल्हयात मजुरांच्या मागणीनुसार मोठया प्रमाणात वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहीरीची कामे मंजूर होती. त्यापैकी ९००० पेक्षा जास्त कामे जवळपास एकाच वेळी प्रत्यक्षात सुरु झाली. (जून/जुलै २०१२) अशा परिस्थितीमध्ये या कामांची मोजमापे घेऊन मुल्यांकन करण्यासाठी जिल्हापरिषदेकडे तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता होती.

III) सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये एका गांवात सुरु असलेल्या अनेक कामासाठी एक एम.बी.किंवा एका कामासाठी एक एम.बी. अशी वेगवेगळी पध्दत होती. पंचायत समितीमध्ये याबाबत सुसुत्रता नव्हती. यामुळे एका कामाचे /हजेरीपटीचे मुल्यांकन करुन हजेरीपत्रक एम.बी.सह मजुरी अदा करणेसाठी पंचायत समिती स्तरावर पाठविणे व तेथून परत आणणे यामध्ये विलंब होत होता.

IV) पंचायत समितीच्या लेखा शाखेत या योजनेचे कामकाज करणेसाठी स्वतंत्र मनुष्यबळ नव्हते. थोडक्या कालावधीमध्ये एकाचवेळी जिल्हयात मोठया प्रमाणावर कामे सुरु झाल्याने मजुरी अदाईसाठी हजेरीपटाची संख्या देखील जास्त होती. त्यामुळे लेखा शाखेत कामकाजासाठी विलंब झाला आहे.

V) पतमर्यादा मागणीवर शासनाकडून/वरिष्ठ कार्यालयाकडून उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता वेळीच न झाल्यामुळे तालुक्यांना काही वेळा पंचायत समित्यांना निधी वितरणामध्ये विलंब होऊन मजुरी अदाई होण्यास विलंब झालेला आहे.

- मजूरी वाटपात होणारा विलंब टाळण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न -

(१) पुरेशा प्रमाणात बाहयस्थ मनुष्यबळ उपलब्ध व त्यांना आवश्यक त्या प्रशिक्षणाची उपलब्धता

(२) हजेरीपटांचे नियंत्रण करण्यासाठी मस्टर ट्रॅकर पध्दतीचा अवलंब

(३) ई-मस्टर व EFMS प्रणालीचा अवलंब

(४) एक काम दाने एम.बी.

(५) नियमित तांत्रिक अधिकाऱ्यांकडून २५% मुल्यांकनाची तपासणी

(६) मजुरांच्या तक्रारीचे निराकरण व्हावे यासाठी तक्रार निवारण अधिकारी (Ombudsman) पदाला व्यापक प्रसिध्दी देण्यात आली.

(७) सर्व लेखांची तपासणी सनदी लेखापालाकडून करण्यात येते.

(८) या योजनेंतर्गत उकृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना केंद्र शासनामार्फत पुरस्कार दिला जातो.

❖ (अ) माढा व मोहोळ तालुक्यातील मोठया प्रमाणावर कामे सुरु असल्याने त्या तालुक्यातील मजुरांना वेळेवर मजुरी मिळावी यासाठी काय प्रयत्न केले ?

- माढा व मोहोळ तालुक्यात प्रामुख्याने मोठया प्रमाणात वैयक्तिक लाभाची सिंचन विहीरीची कामे सुरु असल्याचे परिस्थितीत मजुरांना वेळेवर मजुरी मिळणेसाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

(१) पुरेशा प्रमाणात बाहयस्थ मनुष्यबळ उपलब्ध व त्यांना आवश्यक त्या प्रशिक्षणाची उपलब्धता

(२) हजेरीपटांचे नियंत्रण करण्यासाठी मस्टर ट्रॅकर पध्दतीचा अवलंब

(३) ई-मस्टर व EFMS प्रणालीचा अवलंब

(४) एक काम दोन एम.बी.

(५) नियमित तांत्रिक अधिकाऱ्यांकडून २५% मुल्यांकनाची तपासणी

(६) मजुरांच्या तक्रारीचे निराकरण व्हावे यासाठी तक्रार निवारण अधिकारी (Ombudsman) पदाला व्यापक प्रसिध्दी देण्यात आली.

(७) आर्थिक वर्ष संपल्यानंतर काही कारणांसाठी (MIS वर अपलोड केली नसलेली) प्रलंबित राहिलेल्या हजेरीपटांबाबत व देयकाबाबत आढावा घेऊन शासनास कळवून शासनाच्या सूचनेप्रमाणे चावडी वाचन करुन प्रलंबित मजुरी व देयके देण्याची कार्यवाही करण्यात आली.

❖ (ब) तसेच मजूरांना वेळेवर मजूरी देण्यास ज्या अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही.

- जिल्ह्यात मजुरांच्या मागणीनुसार मोठ्या प्रमाणात वैयक्तिक लाभाच्या सिंचन विहीरीची कामे मंजूर होती. त्यापैकी ९००० पेक्षा जासत विहीरीची कामे जवळपास एकाच वेळी

प्रत्यक्षात सुरु झाली. (जून/जुलै २०११) अशा परिस्थितीमध्ये एकूणच योजनेची अंमलबाजवणी करण्यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीनुसार काम न केल्याचे निदर्शनास आले अशा अधिकारी/कर्मचारी यांचेवर मग्रारोहयो कायद्यातील तरतूदी नुसार कारवाई प्रस्तावित केलेली आहे.

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांनी जिल्ह्यात ११ गट विकास अधिकारी यांच्या विरुध्द शिस्तभंग कार्यवाही करण्यासाठी मा.विभागीय आयुकत कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

सोलापूर जिल्हा येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०११-१२ मध्ये मजूरी वाटपास ५ आठवडयापेक्षा जास्त कालावधी झालेल्या हजेरीपटांची संख्या १०,७७६ एवढी आहे. सन २०१२-१३ मध्ये मजूरी वाटपास ५ आठवडयापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या ८,३१८ एवढी आहे. मजूरी वाटपास ५ आठवडयापेक्षा जास्त विलंब झालेल्या हजेरीपटांची संख्या माढा आणि करमाळा तालुक्यात जास्त आहे. सन २०१२-१३ मध्ये मंजूरी वाटपास विलंब झालेला आहे. सन २००८ मध्ये ही नवीन ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झालेली असल्यामुळे सन २००८-०९, २००९-१० मध्ये मजूरी वाटपास विलंब झाला तर समजु शकतो. परंतू, सन २०१२-१३ मध्ये मजूरी वाटपास विलंब झालेला आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. **शासनामार्फत मजुरांना काम देण्याची हमी देण्यात येते. संबंधीत ग्रामपंचायतीमध्ये फलक लावण्यात येतो. परंतू मजुरांना जर ५ आठवडे मजूरी मिळणार नसेल तर निश्चितच ही बाब योग्य नाही. सबब, सदर प्रकरणी मजूरी वाटपास २ आठवडयापेक्षा जास्त विलंब झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची चौकशी करुन संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी माहिती समितीची शिफारस आहे.**

(६) विहिर कार्यक्रम :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "विहीर कार्यक्रम" यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००९-१० व २०१०-११ या वर्षात जवाहर विहिरींची कामे का घेण्यात आली नाहीत ? या ठिकाणी विभागाचा नियोजनामध्ये अभाव आहे. यंत्रणावाईज नियोजनचा अभाव असल्याचे दिसून येत आहे, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत" विहिरींची कामे करण्यासंदर्भात दिनांक १० मार्च, २०११ रोजीचा एक शासन निर्णय आहे. त्यामध्ये विहिरीसाठी १.९० लाख रुपये अनुज्ञेय आहेत. यापूर्वी सन २००८ रोजीचा एक शासन निर्णय होता.

त्यामध्ये अल्पभूधारक शेतकरी हा महत्वाचा घटक मानलेला होता. त्यावेळी एक लाख रुपयात काम करावयाचे होते. यानंतर दिनांक १० मार्च, २०११ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विहिरीची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास येईल.

सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीतील नियोजनानुसार तिन्ही कामांची टक्केवारी वेगवेगळी घेण्याची कारणे कोणती ? अशी समितीने विचारणा केली की, त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही सर्व कामे व्यक्तीगत स्वरुपाची आहेत. यामध्ये ग्रामपंचायती आणि लाभार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी केली जाते. त्यानुसार ही कामे हाती घेतली आहेत. सन २०११-१२ मध्ये विहिरींच्या कामांची मोठ्या प्रमाणावर मागणी करण्यात आली होती. सन २०१२-१३, २०१३-१४ मध्ये विहिरींच्याच कामांची मागणी करण्यात आली होती. यामुळे ही कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली होती. सामाजिक वनीकरणाची कामे शून्य दाखविण्यात आलेली आहे. खाजगी जमिनीवर फळबाग सोडून वृक्ष लागवडीची कामे हाती घेतली जात आहेत.

सन २००९-१० व २०१०-११ मध्ये विहिरींचा कार्यक्रम का घेण्यात आला नाही, मंजूर विहिरींपेक्षा पूर्ण विहिरींची संख्या ३० टक्क्यांपेक्षा कमी असण्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली, त्यावर जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, दिनांक १० मार्च, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहिरींसाठी १.९० लक्ष रूपये होते. त्यानंतर दिनांक १७ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार मग्रारोहयो अधिनियमाच्या परिशिष्ट-१ कलम १(४) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, भूसुधार योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, कृषी कर्जमाफी योजना २००८ नुसार अल्प भूधारक व सिमांत शेतकरी यांना सिंचन सुविधा म्हणून विहिरींची कामे अनुज्ञेय आहेत. त्याच शासन निर्णयात १५ क्रमांकाच्या परिच्छेदात असे नमूद केले आहे की, "विहिरींच्या कामांकरिता खालील बाबी निषिध्द राहतील :-

(अ) गावामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली अन्य कामे न करता फक्त विहिंरीची कामे घेणे, ज्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर मजुरी : साहित्य यांचे प्रमाणे ६०:४० राखणे शक्य होणार नाही.

(ब) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या मर्यादेचे पालन न करता भूजल पातळीचे शोषण करणे.

(क) लाभार्थ्यांना हजेरीपत्रक सुपूर्द करून त्यांचेकडून कंत्राटदार प्रमाणे कामे करून घेणे किंवा त्यांच्या मार्फत साहित्याची खरेदी करणे.

(ड) ६०:४० चे प्रमाण राखण्यासाठी मजुरी व साहित्याचे प्रमाणाचे चुकीचे वर्गीकरण करणे.

(इ) अपूर्ण जुन्या विहिरी पूर्ण न करता नवीन विहिरी मंजूर करणे.

(ई) अकुशल, कुशल व साहित्याचे MIS वर चुकीच्या नोंदी घेणे.

त्याचप्रमाणे विहिरींची संख्या कमी असण्याची कारणे पुढील प्रमाणे आहे. सन २०११-१२ मध्ये १७०७७ मंजूर विहिरींपैकी ७५५८ विहिरी मंजूर होत्या. त्यापैकी ४७५४ विहिरी पूर्ण झाल्या आहेत व २८०४ विहिरी अपूर्ण आहेत. त्यांची कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

(१) ४४० विहिरींची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत परंतु त्यांना सीसी दिलेली नाही.

(२) ७९२ विहिरी मजुरांअभावी अपूर्ण आहेत.

(३) ५४० विहिरी हार्ड रॉक लागल्यामुळे,

(४) ३३६ विहिरी लाभार्थ्यांच्या वैयक्तिक कारणांमुळे,

(५) ५२८ विहिरी पुरेसे पाणी न लागमुळे अपूर्ण राहिलेल्या आहेत.

पूर्ण झालेल्या विहिरींपैकी किती विहिरींना पाणी लागले नाही ? अशी समितीने विचारणा केली, त्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी असे नमूद केले की, सर्व विहिरींना पाणी लागलेले आहे. १२ मीटरपर्यंत एस्टीमेट आहे तेवढी विहीर खोदलेली आहे. ३ वर्षांपूर्वी मी गट विकास अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यावेळी प्रत्यक्षात विहिरींची पाहणी केली होती. पुढे समितीने अशी विचारणा केली की, विहिरींकरिता देयके मिळाले नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. आपण पूर्ण झालेल्या सर्व विहिरींना पाणी लागल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे सिंचन क्षेत्रात किती वाढ झाली आहे ? त्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये ओलिताखालील क्षेत्रात ५२२९ हेक्टरपर्यंत आणि सन २०१२-१३ मध्ये ११२८.६० हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. १७६ विहिरींच्या पेमेंटसंबंधी अडचणी आहेत. ५९ विहिरींची देयके देय आहेत. या संदर्भातील प्रस्ताव नरेगा आयुक्तालयाकडे पाठविलेले आहेत.

२०० विहिरींची देयके मिळणे प्रलंबित आहे. या संदर्भात प्रशासकीय बाबी तसेच इतर काही कारणे आहेत. विहिरी मंजूर झाल्यानंतर तेथील तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, विहिरी निकषात बसत असल्यास त्यांची कामे सुरु करावीत. त्यानुसार अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी विहिरी घेतल्या. यानंतर त्या विहिरींचे प्रस्ताव तयार करताना अनेक अडचणी आल्या आहेत. त्या विहिरींना पाणी लागले आहे, परंतु आता त्या विहिरी निकषात बसत नाहीत. या संदर्भात मार्ग निघू शकतो का ? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, या संदर्भात शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. समितीने पुढे अशी पृच्छा केली की, विहीर खोदत असताना कठीण खडक लागल्यास त्यासाठी अतिरिक्त निधी दिला जातो का ? काही मजुरांचे असे म्हणणे आहे की, विहिरांना कठीण खडक लागत असल्यामुळे ते दगड फोडण्यास इच्छूक नसतात. त्यामुळे तेथे ब्लास्टिंग करणे आवश्यक आहे, तेथे ६०:४० रेशो आहे. समितीने मिरजगी येथील विहिरीची पाहणी केली असता तेथे कठीण खडक लागल्यामुळे विहिरीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. तेथे ब्लास्टिंग

करणे आवश्यक आहे, जेणेकरून विहीरीचे काम पूर्ण होऊ शकेल. त्यावर जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, अंदाजपत्रकात कठीण खडकासाठी तरतूद केलेली नसली तरी, काम करीत असताना कठीण खडक लागल्यास एमबीनुसार अतिरिक्त पेंमेंट देण्यात येते. याबाबत समितीने असे स्पष्ट केले की, विहीर खोदताना कठीण खडक लागल्यास त्यासाठी अतिरिक्त निधी मिळू शकतो याची लाभार्थ्यांना माहिती देणे आवश्यक आहे. कठीण खडक लागल्यामुळे अनेक विहिरींची कामे २-२ वर्षांपासून बंद आहेत. अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना या संबंधी मार्गदर्शन केले जात नसल्यामुळे अपूर्ण विहिरी पूर्ण कशा होणार, हा महत्वाचा प्रश्न आहे. या संबंधी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे जाऊन त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी असे नमूद केले की, या संदर्भात समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल.

जिल्हा बैठकीत समितीला आश्वासित केल्यानुसार समितीला पुढील प्रमाणे आश्वासित माहिती देण्यात आली :-

❖ जिल्हयात सन २००९-१० ते २०११-१२ या वर्षामध्ये मंजूर विहिरींची संख्या किती आहे ? त्यापैकी पूर्ण व अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत ? त्या पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

- सोलापूर जिल्हयात मग्रारोहयोची सुरुवात मार्च २०११ मध्ये सिंचन विहिरीने झाली. मग्रारोहयो अंतर्गत विहिरीच्या कामाची सद्यस्थिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	मंजूर कामे	सुरु कामे	पूर्ण कामे	अपूर्ण कामे
१	२००१६	९०३७	७४५०	१५८७

सदर १५८७ अपूर्ण कामापैकी

७९८- कामे प्रगतीपथावर आहेत.

१९२- C. C. अपलोड करणेवर आहेत.

३००- लाभार्थी पुढील अपूर्ण काम करण्यात तयार नाही.

२६५- हजरे पत्रक न भरता भौतीकदृष्टया पूर्ण झालेल्या विहिरी आहेत.

३२- अपरिहार्य कारणामुळे अपूर्ण राहिलेली व पूर्ण होऊ न शकणाऱ्या विहिरी

अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या काही प्रमुख मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येऊन त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

- ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात एक वर्षापेक्षा जास्त कालावधी करीता ५ पेक्षा जास्त अपूर्ण कामे असल्यास त्या ग्रामपंचायत क्षेत्रात जिल्हाधिकारी यांचे पूर्व मान्यतेशिवाय नवीन कामांना प्रशासकीय मान्यता देऊ नये.
- अशी काही कामे ही भौतिकदृष्टया काही अपरिहार्य कारणांमुळे कधीच पूर्ण होऊ शकत नाहीत याबाबत तहसिलदार/गट विकास अधिकारी यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अशा सूचना द्याव्यात की, त्या कामांचा पंचनामा करुन आहे त्या परिस्थितीत त्या कामाची नोंद अभिलेखात करावी व तसे कारणे नमूद करुन काम अंशत: पूर्ण समजून त्याची MIS मध्ये नोंद करावी.
- अपूर्ण कामे पूर्ण करणेसाठी कृति आराखडा तयार करुन कालमर्यादेत पूर्ण करण्याची जबाबदारी निश्चित करावी.

समितीने दिनांक १० व ११ जानेवारी, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सोलापूर जिल्हयामध्ये ७००० विहिरी पूर्ण केल्या आहेत. आता यामध्ये मोठया प्रमाणात बदल होत आहे. गेल्या दोन-तीन वर्षामध्ये काही अडचणी येत होत्या परंतू विभागाने आता त्यामध्ये मोठया प्रमाणात सुधारणा केल्या आहेत. रोहयोच्या कामांवर जवळपास १५०० ते २००० कोटी रुपये खर्च होतो. राज्यात जवळपास ३० हजार विहिरी पूर्ण झाल्या आहेत. त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सोलापूर जिल्हयामध्ये ७४५० विहिरींची कामे पूर्ण झाली आहेत. पुढे समितीने अशी विचारणा केली की, सोलापूर जिल्हयामध्ये किती विहिरी पूर्ण करावयाच्या होत्या त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जिल्हयात ९०३७ विहिरींचे काम सुरु केले होते. पंरतू मजूर न मिळाल्याने १९ टक्के काम अपूर्ण राहिले म्हणजेच अजून १५८७ विहिरी पूर्ण व्हावयाच्या आहेत. ८४-८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यावर समितीने विचारणा केली की, हे काम किती वर्षात पूर्ण केले आहे. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरहू विहिरीची कामे मागील वर्षात पूर्ण केलेली आहे. एका विहिरीकरिता १,९०,०००/- रुपये एवढे लिमिट आहे. नवीन योजनेमध्ये ३,००,०००/- रुपये एवढे लिमिट आहे. त्यासंदर्भात समितीने विचारणा केली की, जर १,९०,०००/- रुपयांची लिमिट असलेल्या विहिरी अपूर्ण असतील तर त्या विहिरीबाबत कोणता निर्णय घेण्यात येतो. त्यावर विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सन २०१२ पूर्वी १,९०,०००/- रुपये एवढे लिमिट होते. डिसेंबर, २०१२ नंतर ३,००,०००/- रुपये लिमिट असलेली नवीन योजना अमलात आली आहे.

सदर प्रकरणी समितीने असे नमूद केले की, श्री. व्ही. गिरिराज हे या खात्यावर प्रधान सचिव म्हणून रुजू झाल्यापासून विहिरींच्या कामांना शिस्त लागलेली आहे, त्याबाबत समिती त्यांचे अभिनंदन करते. सोलापूर जिल्हयातील २०० विहिरींपैकी १०० विहिरी २-३ मस्टरमध्ये पूर्ण झालेल्या आहेत. काही विहिरींचे काम थांबलेले आहे. काही विहिरींचे काम मस्टरशिवाय चालू आहे. लोकप्रतिनिधी व प्रशासन यांचा या कामामध्ये फारसा पुढाकार नसल्याने याकडे कोणीही लक्ष देत नाही. परंतु या दोघांच्या उदासिनतेमुळे मस्टरवर असणारे मजूर व मस्टरवर नसणारे मजूर दोघेही भरडले जात आहेत. गट विकास अधिकारी हा एक वर्ग-१ चा अधिकारी वरुन काम सुरु करण्याचे आदेश आल्यानंतर काम सुरु करतो. याबाबत त्याला अन्य कोणतेही अधिकार नसतात. २०० विहिरींपैकी काही विहिरींचे पेमेंट करण्याकरिता महसूल यंत्रणेने तहसिलदार कार्यालयाला प्रस्ताव पाठविलेले आहेत. परंतु अजूनही पेमेंट झालेले नाही. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, सोलापूर जिल्हयामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरींची कामे मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आली होती. सोलापूर जिल्हयामध्ये एकूण ७४०० विहिरी पूर्ण झालेल्या असून १५८७ विहिरी अपूर्ण आहेत. याला विविध कारणे आहेत. यापैकी ७९८ विहिरींची कामे प्रगती पथावर आहे. या कामांपैकी काही विहिरींच्या कामावर काम करणा-या मजूरांची मजूरी वाटप करणे बाकी आहे.

विहिरींच्या कामांची पाहणी, मस्टरची तपासणी, जॉबकार्डप्रमाणे कामाचे वाटप झालेले आहे की नाही याची पाहणी, मजूरांची मजूरी दिली गेलेली आहे का याबाबतही तपासणी करणे आवश्यक आहे. विहिरींची कामे पूर्ण झाल्यानंतर मस्टरवरील सर्व मजूरांची उर्वरित मजूरी रिलीज करण्यात येईल. सोलापूर जिल्हयातील कामे ठराविक कालावधीत पूर्ण करण्यात येतील.

अभिप्राय व शिफारशी :-

सोलापूर जिल्हयात सन २००९-१० व २०१०-११ या वर्षात जवाहर विहिरींची कामे घेण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. मंजूर विहिरीपेक्षा पूर्ण विहिरींची संख्या ३० टक्क्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे या ठिकाणी संबधित विभागाच्या नियोजनामध्ये अभाव असल्याचे समितीला दिसून आले. "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत" विहिरींची कामे करण्यासंदर्भात दिनांक १० मार्च, २०११ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये १.९० लाख रुपये विहिरीच्या कामासाठी अनुज्ञेय आहेत. त्यामुळे भविष्यात मोठया प्रमाणात विहिरींची कामे हाती घेण्यात येतील असे नमूद करण्यात आले असले तरी अद्याप विहिरींची कामे हाती घेण्यात आली नाहीत.

विहिरीकरिता देयके मिळाली नसल्याच्या अनेक तक्रारी समितीस प्राप्त झालेल्या आहेत. विहिरी मंजूर झाल्यानंतर निकषात बसत असल्यास विहिरींची कामे सुरु करावीत असे तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना सांगितले त्यानुसार अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी विहिरींची कामे सुरु केली, नंतर त्या विहिरींचे प्रस्ताव तयार

करताना अनेक अडचणी आल्या. **विहिरींना पाणी लागले परंतू त्या विहिरी निकषात बसत नसल्यामुळे विहिरींची देयके प्रलंबित आहेत. तरी शेतकऱ्यांनी घेतलेल्या विहिरी निकषात बसवून त्यांची प्रलंबित असलेली देयके देण्याबाबत शासन स्तरावर तात्काळ निर्णय घेऊन त्यांची देयके अदा करण्यात यावीत. सदर प्रकरणी शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला याची माहिती समिती तीन महिन्यात पाठविण्यता यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विहिरी खोदत असताना कठीण खडक लागल्यास मजूर कठीण खडक फोडण्यास उत्सुक नसतात. त्याठिकाणी ब्लस्टिंग करणे आवश्यक असते, कठीण खडक लागल्यामुळे मजूर काम करत नाहीत. त्यामुळे काम अपूर्ण अवस्थेत राहते तसेच विहिर खोदत असताना कठीण खडक लागल्यास अतिरिक्त निधी देण्यात येतो. याबाबतची माहिती लाभार्थ्यांना नसते, अनेक विहिरींची कामे निधी अभावी बंद असतात. **तरी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रलंबित विहिरींची कामे पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांकडे जाऊन त्यांना मार्गदर्शन करावे, त्यांचे प्रबोधन करावे तसेच कठीण खडक लागल्यास ब्लास्टिंग करण्यासाठी त्यांना अतिरिक्त निधी देण्यात यावा. तसेच यासंदर्भात त्यांना योग्य प्रकारे माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येत असलेल्या विहिरींच्या कामांना मंजुरी देतांना सोबत कृषि पंप व वीज कनेक्शनही उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(७) गैरव्यवहाराची प्रकरणे :-

समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी जिल्हयातील १९ गैरव्यवहारांच्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता उपायुक्त (रोहयो) यांनी समितीला अशी माहिती दिली की, मोहोळ फळबाग लागवड योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराप्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे. या प्रकरणी कोर्टात केसेस सुरु आहेत. कोर्टाने असे आदेश दिलेले आहेत की, जोपर्यंत फौजदारी केसचा निकाल लागत नाही तो पर्यंत सदर प्रकरण प्रलंबित ठेवावे.

मौजे कासारी, तालुका बार्शी येथील मृदसंधारण विभागातील रोहयो कामाच्या धान्य कुपन्स वाटपामध्ये झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी संबंधितांविरूध्द एकत्रित विभागीय चौकशी कार्यवाही शासन स्तरावर होण्याबाबत दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. या प्रकरणी गैरव्यवहाराची रक्कम अतिशय अल्प आहे. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, रक्कम लहान किंवा मोठी असो त्यात भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे आपण शासन स्तरावर पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्यावर उपायुक्त (रोहयो) यांनी असे नमूद केले की, समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल. मी उपायुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला त्यावेळी गैरव्यवहाराची एकूण ७४ प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी आता १८ प्रकरणे शिल्लक राहिली आहेत. (परिशिष्ट - पाच) समितीने पुढे अशीही पृच्छा केली की, सदर प्रकरण २००४ मधील असताना शासन स्तरावर

२०१३ मध्ये कागदपत्रे पाठविली आहेत. या प्रकरणी इतका विलंब का झाला ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधीनी असे सांगितले की, सदर प्रकरण दिनांक २८ जानेवारी, २०१३ रोजी शासन स्तरावर प्राप्त झालेले आहे.

मौजे नरखेड, तालुका मोहोळ येथील शेततळ्याच्या कामावर झालेल्या गैरव्यवहाराचे प्रकरण दिनांक ४ जानेवारी, २०१४ रोजी उपायुक्त कार्यालयाकडे प्राप्त झाले असून ते सध्या प्रलंबित आहे. येत्या ८ ते १० दिवसांत या प्रकरणाची कार्यवाही पूर्ण केली जाईल. मौजे शिंगडगाव येथील नाला बंडिंग कामावरील अनियमिततेचे प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित आहे. उपायुक्त कार्यालयाकडून कळविल्याप्रमाणे प्रस्तावातील जोडपत्रे ४ मधील तांत्रिक मंजुरीची छायाप्रत सादर करण्यासंबंधी तालुका कृषी अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे असे उपायुक्त रोहयो यांनी सांगितले. तसेच सोलापूर जिल्हयात सन २००५ मध्ये रोहयो अंतर्गत कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी १४१ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. हा सोलापूर जिल्हयातील सर्वात मोठा गैरव्यवहार आहे. या प्रकरणी सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. श्री. अशोक विभुते यांनी चौकशी करून अहवाल सादर केला होता. त्यात ३ लोकांना त्यांनी दोषी ठरविले होते. फौजदारी गुन्हा १३ जणांविरूध्द दाखल केला होता. या प्रकरणी कमीत कमी १३ लोकांना दोषी ठरवावयास पाहिजे होते. १६६ पानांचा चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे. हा चौकशी अहवाल १४१ लोकांना कळवावा आणि त्यांच्याकडून अभिप्राय मागवून घ्यावेत, असे कळविले आहे. त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. दिनांक १७ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांना त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे. यासंदर्भात समितीने असे निदर्शनास आणून दिले की, फेब्रुवारी, २०१२ मध्ये न्यायाधीशांचा चौकशी अहवाल आपल्याला प्राप्त झालेला आहे. त्यावर उपायुक्त रोहयो यांनी असे सांगितले की, सदर अहवाल ताबडतोब शासनाकडे पाठविलेला आहे. अंतिम शिक्षा आदेश पारित करणेसाठी दिनांक ७ डिसेंबर, २०१२ रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या संदर्भात शासनाने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

सन २००५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झालेला आहे. या गैरव्यवहारामुळे सोलापूर जिल्ह्याचे नाव बदनाम झालेले आहे. याबाबत उपायुक्त (रोहयो) यांनी असे नमूद केले की, या प्रकरणी शासन स्तरावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. तसेच विभागीय प्रतिनिधींनी शासनाला चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे आणि त्या अनुषंगाने निवेदन मागविण्यात आले आहे असे सांगितले. पुढे समितीने अशी विचारणा केली की, या संदर्भात कोणती कार्यवाही केलेली आहे ? त्यावर विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, या संदर्भात वरिष्ठ पातळीवर निर्णय घ्यावा लागेल.

मौजे अचकदाणी, ता.सांगोला येथील वन तळ्याच्या कामावरील भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, श्री.राजाराम काळेबाग या मजुराची त्यांना मजुरी मिळाली नाही अशी तक्रार होती. या प्रकरणी आयुक्त स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

श्री. व्ही.एल.भिरुड, कार्यकारी अभियंता व इतर २ यांच्या विरुद्ध एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही करणे बाबतच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करुन हे प्रकरण शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

सांगोला तालुक्यातील रोहयोच्या रस्त्याच्या कामामध्ये केलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये सामान्य प्रशासन विभाग असून या विभागाकडे हे प्रकरण प्रलंबित आहे. चौकशी अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

मौजे मेंढापूर, ता.पंढरपूर येथील रोहयो अंतर्गत पाझर तलाव ४ मधील कामातील अनियमिततेच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, हे प्रकरण चौकशी अधिकाऱ्यांकडे चौकशीसाठी प्रलंबित आहे.

पाझर तलाव मसले चौधरी क्र.८ ते १०, ता.मोहोळ या कामामध्ये झालेल्या अनियमिततेच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, हे प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे. या प्रकरणी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी शासनाला अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

जिल्हा बैठकीत समितीला आश्वासित केल्यानुसार समितीला पुढील प्रमाणे आश्वासित माहिती देण्यात आली :-

- ❖ गैरव्यवहारांच्या १८ प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? प्रकरण निहाय सविस्तर माहिती समितीला द्यावी.
  - सोलापूर जिल्हयातील प्रलंबित असलेल्या १८ गैरव्यवहारांच्या प्रकरणांपैकी ५ प्रकरणांची प्रकरण निहाय माहिती व सद्यस्थिती परिशिष्ट - पाच मध्ये नमूद करण्यात आली आहे.
- ❖ सोलापूर जिल्हयात सन २००५ मध्ये रोहयो अंतर्गत कामात झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी १४१ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. यासंदर्भात सादर झालेल्या चौकशी अहवालानुसार किती जणांना दोषी ठरविण्यात आले ? किती जणांवर कारवाई

करण्यात आली ? किती जणांना अहवाल कळविण्यात आला व किती जणांनी खुलासे सादर केले ? जिल्हाधिकारी कार्यालयाने त्रुटींची पूर्तता केली आहे काय ? असल्यास केव्हा ? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ? यासंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट करण्यात यावी.

- परिशिष्ट - पाच गैरव्यवहार प्रकरणांच्या माहितीमधील अ.नु. ५ वर सविस्तर माहिती सादर करण्यात आली आहे.
- विभागीय आयुक्त यांचेकडील दि. ३०/११/२००९ चे आदेशानुसार विभागीय चौकशीची कार्यवाही ॲड. श्री. आशोक विभुते, सेवानिवृत्त अति. जिल्हा न्यायाधीश यांनी पूर्ण केली व दि. २७/०२/२०१२ रोजी चौकशी अहवाल सादर केला.
- एकूण १४१ अपचाऱ्यापैकी फक्त ५ अपचारी यांना दोषी ठरविले आहे.
- सदर चौकशी अहवालाच्या निष्कर्षास विभागीय आयुक्त कार्यालयाची असहमती असल्याबाबत चौकशी अहवालाच्या प्रतीसह संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना नोटीसा बजावून पूर्तता अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केलेला आहे. १४१ अपचारी पैकी ५ अपचारी मयत व १ अपचारी यांचा पत्ता मिळून न आल्याने संबंधित कागदपत्रे विभागीय आयुक्त कार्यालयास परत करण्यात आले आहेत.
- अपचारी यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे खुलासे सादर केले आहेत.
- जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर त्रुटी पूर्ततेची बाब प्रलंबित नाही.
- सद्यस्थितीमध्ये १४१ अपचाऱ्यांपैकी १३ अपचारी याच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत व न्यायालयीन सुनावणी सुरु आहे.
- सद्यस्थितीत सदर प्रकरण आयुक्त स्तरावर प्रलंबित आहे. एकूण १४१ अपचाऱ्यांपैकी फक्त ५ अपचारी यांना दोषी ठरविले आहे. परंतू यापूर्वी १३ अपचारी यांचेवर गुन्हे दाखल केले आहेत. चौकशी अहवाल मान्य केलेस ८ अपचारी कोर्टातही निर्दोष सुटतील त्यामुळे १३ अपचारी वगळून इतर १२८ अपचारी यांना दोषमुक्त करणेबाबत शासन स्तरावर निर्णय घेणे आवश्यक आहे.

❖ कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्र.१, सोलापूर या यंत्रणेमधील कार्यकारी अभियंता व इतर २ यांच्या विरुध्द एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याबाबत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ?

- विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असून श्री. भिरुड व श्री. राजभोज शिक्षा होणेसाठी संबंधित कागदपत्रे विभागीय आयुक्त कार्यालयाचे दि. ११-०२-२०१४ च्या पत्रान्वये शासनाकडे पाठविणेत आलेली आहेत.

❖ सांगोला तालुक्यातील रोहयो रस्त्याच्या कामामध्ये केलेल्या गैरव्यवहाराच्या प्रकरणाचा अंतिम निर्णय घेण्यात आला काय ?

(१) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील गोपनिय पत्र क्र. रोहयो १३१०/प्र.क्र.१२४/रोहयो-२ दि. २८.०२.२०११ अन्वये श्री. शेळके, उपअभियंता यांना सादर प्रकरणी वगळण्यात आले आहे.

(२) श्री. घोंगडे, किर्ती व श्री. शिवशरण यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली असून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

(३) विभागीय आयुक्त कार्यालयाकडील दि. ०८/०८/२०१४ च्या पत्रान्वये चौकशी अहवालाची प्रत संबंधिताना बजावणे कामी जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांना पाठविण्यात आली आहे.

समितीने सोलापूर जिल्हयाला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली, सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, गैरव्यवहारांच्या १८ प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? प्रकरण निहाय सविस्तर माहिती समितीला द्यावी. याबाबतची माहिती परिशिष्ट - पाच मध्ये नमूद केली आहे. जिल्हा परिषद, बांधकाम विभाग क्रमांक १, सोलापूर या यंत्रणेमधील कार्यकारी अभियंता व इतर २ यांच्या विरुध्द एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याबाबत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता सह सचिव (रोहयो) यांनी अशी माहिती दिली की, या प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडून मान्यता घेऊन त्यानंतर मंत्री महोदयांची मान्यता घेण्यात येईल. सदर कार्यवाही पूर्ण होण्यास जवळपास १५ दिवस लागतील. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर समितीला शासनामार्फत कळविण्यात येईल. याबाबत समितीने असे सूचित केले की, विभागीय आयुक्त स्तरावरील विभागीय चौकशीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासन स्तरावरुन स्मरणपत्र देण्यात यावे. याबाबत उपायुक्त यांनी असे सांगितले की, आयुक्त स्तरावर सध्या ५ प्रकरणे आहेत. त्यामधील ४ प्रकरणे ८ तारखेला जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत ही ५ प्रकरणे निकाली काढण्यात येतील. यासंदर्भात समितीने सूचित केली की, सदरील प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यात यावीत. तसेच या प्रकरणी अधिकारी दोषी आढळून आले तर त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. त्यावर उपायुक्तांनी नमूद केले

की, सोलापूर जिल्हयात सन २००८-०९ मध्ये विभागीय चौकशीची ७४ प्रकरणे होती त्यापैकी आता ११ शिल्लक राहिली आहेत. डिसेंबर अखेर पर्यंत त्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

विभागीय चौकशी किती दिवसात संपवावी लागते, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिव (रोहयो) यांनी विभागीय चौकशी जास्तीत जास्त २ वर्षामध्ये संपविली पाहिजे अशी माहिती दिली. त्यावर समितीने असे नमूद केले की, एखाद्या अधिकारी / कर्मचाऱ्याविरूध्द विभागीय चौकशी चालू असेल आणि त्या दरम्यान तो निवृत्त झाल्यास चौकशी करण्याचे प्रयोजन राहत नाही. अशी परिस्थिती उद्‌भवू नये या करिता शासनाने तातडीने कार्यवाही केली तर प्रशासनाचा धाक राहील. याबाबत उपायुक्त यांनी असे सांगितले की, श्री. ना. गु. काळे, उपविभागीय अभियंता यांच्या विरूध्द दोन विभागीय चौकशीची प्रकरणे चालू होती. त्यामध्ये ते दोषी आढळल्याने त्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. तसेच सह सचिव (रोहयो) यांनी असेही नमूद केले की, श्री.काळे हे वर्ग-१ चे अधिकारी असल्याने सदर प्रकरण एम.पी.एस.सी.कडे पाठविण्यात आले आहे.

अभिप्राय व शिफारशी :

सोलापूर जिल्हयामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत गैरव्यवहाराची १९ प्रकरणे असून त्यापैकी अनेक प्रकरणांवर कार्यवाही सुरु असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सन २००४ पासून गैरव्यवहाराची प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. ज्या प्रकरणांचे दावे न्यायालयात सुरु आहेत, त्याबाबत समिती समजू शकते. परंतू ज्या प्रकरणाची अद्यापपर्यंत विभागीय चौकशी सुरु आहे, त्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करुन तात्काळ दखल घेऊन प्रकरणे निकाली काढणे आवश्यक होते. गैरव्यवहार केलेल्या काही प्रकरणांची अद्याप वसूली झालेली नाही. **रोजगार हमी योजनेंतर्गत पाझर तलाव क्र. ४ मेंढापूर ता. पंढरपूर या कामामधील अनियमितता व नुकसानीबाबत, पाझर तलाव मसले क्र. ८ व १० ता. मोहोळ अंतर्गत कामात अनियमितता व गैरव्यवहार, पाझर तलाव किणी क्रं.१ ता. अक्कलकोट या कामातील गैरव्यवहार, तसेच रोजगार हमी योजना कामाचे पेड मस्टर्स जमा न केल्याबाबतच्या प्रकरणासंदर्भातील कारवाई संबंधीत अधिकाऱ्यांनी अद्याप पूर्ण केलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

वास्तविक पहाता गैरव्यवहाराची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे आवश्यक असते. कारण संबंधीत अधिकारी अथवा कर्मचारी यांची बदली झाली तर कारवाई करण्यास विलंब होतो. तसेच गैरव्यवहार केलेला अधिकारी/कर्मचारी सवोनिवृत्त झाल्यास त्यांची चौकशी करण्यास विलंब होतो. त्यामुळे गैरव्यवहाराची प्रकरणे निकाली काढणे शक्य होत नाही. सबब, यापुढे गैरव्यवहाराची प्रकरणांची चौकशी करुन ती त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

-----//-----

बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०१४

समितीची अनौपचारिक बैठक शासकीय विश्रामगृह, **सोलापूर** येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते :-

समिती प्रमुख:

(१) ॲड.सदाशिवराव पाटील, वि.स.स.

समिती सदस्य:

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.

(३) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(४) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(५) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(६) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.

(७) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(८) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(१०) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.

(११) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.

(१२) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

(१३) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. म. मु. काज, उप सचिव,

(२) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

नियोजन विभाग (रोहयो) मंत्रालय मुंबई.

(१) श्री. संतोष नवघरे, कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय,

(२) श्री. प्रदिप पाटील, उपायुक्त (रोहयो), पुणे विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय

श्री. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी

<u>स्थानिक लोकप्रतिनिधी :-</u>

(१) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. दिलीप माने, वि.स.स.

(३) श्री. दीपक साळुंखे, वि.प.स.

सदरहू बैठकीत समितीने सोलापूर जिल्ह्यात सुरु असलेल्या कामांबाबत चर्चा केली व त्यानंतर समितीने जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांना भेटी दिल्या.

शनिवार, दिनांक ११ जानेवारी, २०१४

समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे घेण्यात आली आहे. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख:

(१) ॲड.सदाशिवराव पाटील, वि.स.स.

समिती सदस्य:

(२) श्री.अनिल बावनकर, वि.स.स.

(३) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(४) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(५) श्री.दिपक चव्हाण, वि.स.स.

(६) प्रा.लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.

(७) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(८) श्री.हरिष पिंपळे, वि.स.स.

(९) श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.

(१०) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.

(११) श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स.

(१२) श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.

(१३) श्री.सुमंत गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री.म.मु. काज, उप सचिव,

(२) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

(१) श्री.संतोष नवघरे, कार्यासन अधिकारी

<u>विभागीय अधिकारी</u>

१) श्री. प्रविण गेडाम, जिल्हाधिकारी, सोलापूर

२) श्री. दिनेश भालेदार, उप जिल्हाधिकारी (रोहयो), सोलापूर

३) श्री. प्रदीप पाटील, उपायुक्त, (रोहयो)

४) श्री. तुकाराम कासार, मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर

५) श्रीमती मनिषा देसाई, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

६) श्री. एस.एस. जोशी, अधीक्षक अभियंता, सा.बां.विभाग, सोलापूर

७) श्री. अशोक डी.पाटील, उप संचालक, सामाजिक वनीकरण सोलापूर

८) श्री. के.डी. ठाकरे, उप वन संरक्षक, सोलापूर

९) श्री. एन. आर. कारीमुंगी, का.अ. ल.पा.(स्था.स्त) विभाग सोलापूर

१०) श्री. आर. एस. नाईकवाडी, जि.अ.कृ.अ., सोलापूर

या बैठकीत सोलापूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामातील अडचणी व उणिवा तसेच रोहयोच्या कामांना भेटी दिल्यानंतर आढळून आलेल्या त्रुटीबाबत जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी यांच्याशी समितीने चर्चा केली व समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात जिल्हाधिकारी व रोजगार हमी योजनेशी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेचे प्रमुख यांच्याशी चर्चा केली.

मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१४

मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी दुपारी २.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे समितीची बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

(१) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती सदस्य

(२) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(३) प्रा. लक्ष्मण ढोबळे, वि.स.स.
(४) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(६) श्री. नरेंद्र अण्णा पाटील, वि.प.स.
(७) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

श्री. म. मु. काज, उप सचिव,
श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

मंत्रालय विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, (रो.ह.यो. व जलसंधारण)
(२) श्रीमती प्रणाली चिटणीस, सह सचिव, नियोजन विभाग (रो.ह.यो.)

विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :

(१) श्री. प्रदिप पाटील, उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर :

(१) डॉ. प्रविण गेडाम, जिल्हाधिकारी, सोलापूर.
(२) श्रीमती ज्योती पाटील, उप जिल्हाधिकारी (रो.ह.यो.), सोलापूर.

जिल्हापरिषद कार्यालय, सोलापूर :

(१) श्री. सुरेश काकाणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर.
(२) श्री. ब. दा. तोंडे, अधिक्षक अभियंता, भी.का.मं.,सोलापूर.
(३) श्री. र. शा. नाईकवाडी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.
(४) श्री. संजय सा. माळी, कार्यकारी अभियंता, जि.प.,बांध.१,सोलापूर.
(५) श्री. राजेश पाटील, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पंढरपूर.
(६) श्री. एस. जी. गायकवाड, का.अ.,सा.बां.विभाग, क्र.१ व क्र.२ सोलापूर .
(७) श्री. व. स. नाईकनवरे, का.अ.,ल.पा.(स्था.स्त) विभाग, जि.प.,सोलापूर.
(८) श्री. बिराजदार, का.अ.,उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर.

(९) श्री. ने. ना. गोरे का.अ., उजनी क्र.९, मंगळवेढा, सोलापूर.
(१०) श्री. स. पा. शिंदे, का.अ., भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर.
(११) श्री. राठोड, का.अ., सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर.
(१२) श्री. जे. एल. शिंदे, उप संचालक, सा.बां.विभाग, सोलापूर.
(१३) श्री. अशोक दबडे, गट विकास अधिकारी, (म.रा.ग्रा.रो.ह.यो.) सोलापूर.
(१४) श्री. बी. एस. रामशेट्टी, प्रभारी उप अभियंता, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर व इतर संबंधित अधिकारी.

या बैठकीत सोलापूर जिल्ह्यातील रोहयोंच्या कामासंबंधात सोलापूर जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनाबाबत व त्या संदर्भातील समितीच्या प्रश्नावलीनुसार नियोजन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

बुधवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१५

रोजगार हमी योजना समितीची बैठक बुधवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी सकाळी/दुपारी १२.०० वाजता विधान भवन, नागपूर येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

समिती प्रमुख

(१) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
(३) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.
(४) प्रा. संगिता ठोंबरे, वि.स.स.
(५) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.
(६) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(७) डॉ. सतीश पाटील, वि.स.स.
(८) ॲड. राहूल कुल, वि.स.स.
(९) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(१०) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
(११) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(१२) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.
(१३) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. म. मु. काज, सह सचिव (२),

(२) श्री. शशिकांत गायकवाड, अवर सचिव.

दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीत समितीने सोलापूर जिल्हयासंदर्भातील प्रारुप अहवालावर विचार करुन आवश्यकत्या सुधारणांसह संमत केला.